शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(खाजगी वितरण)

अंक जानेवारी २०२१

अंक क्र. ४५

Website : www.bhidekul.in

Email : office@bhidekul.in

वर्ष : 48 अंक : 26 कोल्हापूर सोमवार ता. 4 जानेवारी 2021 किंमत 2 रुपये ✻ पाने 4+12 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## लेखन स्पर्धा २०२०-२१

गेली दोन वर्षे लेखन स्पर्धा घेत आहोत आणि त्याला उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. ह्या वर्षी पुन्हा आपण वेगवेगळे विषय देऊन स्पर्धा घेत आहोत. आलेल्या उत्कृष्ट लेखांना भिडे संमेलनामध्ये भरघोस पारितोषिके दिली जातील. आपला प्रतिसाद हीच 'आम्ही भिडे' अंकाची ताकद आहे. म्हणून 'लिहिते व्हा'. लेख पाठविण्यासाठी पत्ता - **दिलीप वासुदेव भिडे, सी-१०२, मेघमल्हार रागा अपार्टमेंट, एल.एम.डी. चौकाजवळ, मराठा मंदिर मागे, बावधन, पुणे-४११०२१ किंवा dilip.bhide15@gmail.com** ह्या संकेत स्थळावर सुद्धा पाठवू शकता. (शब्द मर्यादा ३०० शब्द फक्त) लेख देताना फूलस्केप कागदावर हस्ताक्षरात किंवा टाईप केलेला असावा. लिखाण मराठीतच असावे. शीर्षक आवश्यक. लेख कागदाच्या एका बाजूस लिहावा. जानेवारी २०२१ च्या अंकापासून प्रत्येक आलेल्या लेखाला प्रसिद्धी दिली जाईल. सोबत एक आयकार्ड साईज फोटो देणे आवश्यक आहे. लेख पाठविण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२१ आहे. विषय खालीलप्रमाणे -

**१) नातीगोती -** माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो जितक्या लोकांच्या संपर्कात असतो तितका तो हुरहुन्नरी राहतो. त्यामुळे माणसे जोडण्याची सवय म्हणा किंवा संपर्कात असताना तो आपलेपणाच्या सहवासात वावरत असतो. तुम्ही सुद्धा वेगवेगळ्या अनुभवांतून, प्रसंगानुसार अशी नाती जोडली असतील. अशी नाती रक्ताच्या नात्यांपेक्षा सुद्धा अधिक मायेची, आपुलकीची होतात व आयुष्यभर ती नाती जपण्यासाठी असलेल्या नात्याची गोष्ट लिहा. यामध्ये शक्यतो रक्ताच्या नात्यांपेक्षा अधिक वेगळे अनुभवलेले नाते अपेक्षित आहे.

**२) स्टार्टअप -** मुले, मुली, गृहिणी, तरुण छोटेखानी व्यवसाय करतात. कमी भांडवल असून सुद्धा धाडस करतात. त्यासाठी मार्केटींग करण्यासाठी सोशल मिडियाचा वापर करून गुणवत्ता टिकवण्यासाठी हुशारीने व्यवसाय करतात. त्याकरिता भांडवलाची जमवाजमव, कच्चा माल, उद्योग सुरू करण्याची कल्पना सुचणे, तसेच त्या व्यवसायात येणाऱ्या अडचणी आणि त्यातून मार्ग काढताना आलेले चांगले-वाईट अनुभव, यश-अपयश ह्या दृष्टीने व्यवसायात बसलेला जम हे अपेक्षित आहे.

**३) माझी खादाडी -** मी एका वेळेस एका बैठकीमध्ये ५० गुलाबजाम किंवा ५० पाणीपुरी खाल्या अथवा १५ ते २० ओली भेळ, २० ते २५ केळी एका वेळी फस्त केली. काही आवडीचे खाद्यपदार्थ पैज लावून खाल्ले. असे खाण्याचे विक्रम तुम्ही केलेले असतील आणि त्यातून झालेला त्रास अथवा आनंद कसा झाला ह्याचे रंजक अनुभव पाठवा ज्यामुळे वाचकांना हे आश्चर्य वाटेल.

**४) टोपणनावांची गोष्ट -** बारशाला नामकरण होतं तरीसुद्धा बंड्या, गोट्या, बाळू, बेबी इत्यादींप्रमाणे टोपणनावांने घरात संबोधले जाते आणि आयुष्यभर मूळ नाव विसरून ह्याच नावाने हाक मारली जाते. त्यासाठी घडलेले काही प्रसंग आणि आलेले अनुभव आपल्या शब्दात लिहा.

**५) एका ट्रिपची गोष्ट -** आपल्या कुटुंबासोबत, मित्रांबरोबर किंवा नाते-वाईकांसमवेत पिकनिकला जातो. त्यावेळेस आलेल्या जवळीकीतून आपुलकी, प्रेम निर्माण होते. काहींची त्या निमित्ताने लग्नं सुद्धा ठरतात अथवा ट्रिपमध्ये अभूतपूर्व अशी घडलेली घटना, वाईट घटना आणि त्यातून आलेले चांगले-वाईट अनुभव म्हणजे आयुष्यभर शिदोरी मिळते. त्यानुरूप घडलेले प्रसंग.

**६) रि-युनियन -** लहानपणी गल्लीत, शाळेत, वाड्यात एकत्र असतो परंतु शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने तात्पुरता दुरावा येतो. आयुष्याच्या निवृत्तीच्या टप्प्यानंतर पुन्हा एकत्र येतो आणि त्यावेळेस राग, लोभ, स्वार्थ न राहता असते ती फक्त निखळ मैत्री. आयुष्याच्या रामरगाड्यात असे मिळालेले दोन दिवस एक नवी ऊर्जा देऊन जाते. त्यासाठी आलेले अनुभव.

**७) दाद-फिर्याद -** आपल्या हक्कासाठी, इस्टेटीसाठी न्यायालयात अनेक वर्षे कायदेशीर लढाई करतो किंवा एखादी वस्तू, जमीन खरेदी करताना एक ग्राहक म्हणून आपल्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत किंवा फसवणूक झाली तर ग्राहक पंचायत, न्यायालयाकडे दाद मागावी लागते. त्याकरिता आपल्याला आलेले बरे-वाईट किंवा चांगले अनुभव अथवा त्यामधून आपल्याला काय शिकायला मिळाले ?

**८) भटकंती -** भटकंती करण्यासाठी काही मंडळी देश-विदेशात भेट देतात तर काही कौटुंबिक मेळावा व कार्य ह्या निमित्ताने प्रवास करतात तर काही जण कोणत्याही ट्रॅव्हल्स वा गाईडची मदत न घेता प्रवासाचे नियोजन करतात, काहींसाठी भटकंती म्हणजे विरंगुळा असतो तर काहीजण आवर्जून जिद्दीने भटकंती करतात त्यावेळेस आलेले चांगले-वाईट अनुभव.

**९) शेजारी -** माणूस समाजप्रिय आहे. आपल्या वाडीत, वस्तीत, फ्लॅट संस्कृतीमध्ये सुख-दुःखाच्या क्षणी असणारा शेजार हा रक्ताच्या नात्यापेक्षाही आपुलकीचा वाटतो. कोणत्याही क्षणी, मदतीसाठी धावणारा, जिवापाड प्रेम करणाऱ्या शेजाऱ्यांचा निःस्वार्थ, निःशब्द मैत्रीचा अनुभव.

**१०) शाळा किंवा महाविद्यालयीन शिक्षण घेताना असलेली आठवण/आठवणी.**

**आर्थिक मदत : श्री. मिलींद सोमेश्वर भिडे, बडनेरा, अमरावती ह्यांची कन्या कु. मधुरा हिचे विवाहासाठी रु. ३०,००० नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून आर्थिक मदत देण्यात आली. करोनामुळे लॉकडाऊनच्या काळात आर्थिक अडचणीमुळे विवाहासाठी प्रतिष्ठानने मदतीचा हात दिला.**

## विवाह सुवर्णोत्सव

ज्या भिडे कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दांपत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दांपत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या जोडीदाराच्या साथीने व्यतीत केलेली ५० वर्षातील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन/कविता १५० शब्दांपेक्षा शक्यतो जास्त असू नये. तसेच लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. त्याचप्रमाणे आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. असे लेख/कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रकाशित केले जातील.

✲ अधिक माहितीसाठी संपर्क :

दिलीप भिडे, पुणे. ९६५७५४१२३६ किंवा ले. क. सुनिल भिडे, पुणे मो. ९६२३०१७४४४ किंवा ई-मेलसाठी dilip.bhide15@gmail.com येथे पाठवावेत.

आम्ही भिडे अंक ४५ वा

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे

कार्यकारी संपादक : श्री. दिलीप भिडे

संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, सौ. स्नेहल भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. प्रभाकर भिडे, श्री. राजेंद्र भिडे, श्री. विनायक वि. भिडे, सौ. मेघना भिडे, सौ. प्रिती भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे

सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, श्री. शंतनु नि. भिडे, के. मो. भिडे, श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे, डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे

अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

पत्रव्यवहारासाठी पत्ता

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**

**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**

**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**

**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**

ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.

१) सौ. राधा माधव भिडे, नाशिक, २) सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे (भिडे), घाटकोपर, मुंबई, ३) मधुकर गोविंद भिडे, बडोदा, ४) मीरा मधुकर भिडे, बडोदा, ५) हेमलता जयंत भिडे, दादर, मुंबई ६) श्री. नरेंद्र सदाशिव भिडे, पुणे

## इयत्ता १० वी आणि १२ वी यशस्वी विद्यार्थी/ विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन !



चि. मनिष मंदार भिडे, रत्नागिरी
इ. १० वी शालांत परीक्षेत
९१.८०% गुण
५०० पैकी ४५९ गुण



कु. प्रत्युषा प्रशांत भिडे, दादर
इ. १० वी शालांत परीक्षेत
८३.३८% गुण
५०० पैकी ४१७ गुण



कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली
इ. १० वी शालांत परीक्षेत
८५.४०% गुण
५०० पैकी ४२७ गुण



कु. तनया मुकुंद भिडे, सांगली
इ. १२ वी उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत ९०.६२% गुण
६५० पैकी ५८९ गुण

कु. धनश्री सचिन भिडे, तळेगांव दाभाडे, पुणे
इ. १० वी शालांत परीक्षेत ९५.६०% गुण
५०० पैकी ४७८ गुण



## एक आठवण : नरेंद्र भिडे

माझी ओळख प्रथम सांगलीतील २००३ मध्ये भिडे संमेलनात झाली. ते पुण्यात स्थाईक असल्यामुळे आणि मी पुण्यामध्ये कुलवृत्तासाठी भिडे कुटुंबीयांची माहिती गोळा करत असल्यामुळे मी त्या निमित्ताने पटवर्धन बागेतील त्यांच्या निवासस्थानी त्यांच्या वडिलांना आणि त्यांना भेटण्याचा योग आला. त्यावेळी म्हणजे सुमारे १४ ते १५ वर्षांपूर्वीसुद्धा हा माणूस कामामध्ये व्यस्त असे. तरीसुद्धा वेळात वेळ काढून माझी आस्थेने चौकशी केली. त्यानंतर आम्ही भिडे अंकामध्ये काही आर्टिकलच्या निमित्ताने कधी फोनवर तर कधी प्रत्यक्ष भेट होत असे. त्यांचा संगीत दिग्दर्शक असलेला 'पाऊलवाट' ह्या चित्रपटाच्या प्रिमिअर शोसाठी मला फोन करून आवर्जून निमंत्रण दिले होते. त्या दिवशी एवढ्या गडबडीत असून सुद्धा त्यांनी त्यामधील कलाकारांची ओळख मला सांगितली हे विशेष वाखाणण्यासारखे होते. आपुलकी व माणुसकी याचा प्रत्यय त्यावेळी मला दिसला. सदा हसतमुख चेहरा आणि व्यक्तिमत्त्व पुन्हा दिसणार नाही आणि भेट होणार नाही ही सल मात्र कायम राहील. ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना !

**- दिलीप भिडे, पुणे**
**मो. ९६५७५४१२३६**

## अभिनंदन !

रत्नागिरी येथील सौ. विशाखा मोहन भिडे ह्या पहिल्या महिला कीर्तन अलंकार पदविकाधारक झाल्या आहेत. दादर (मुंबई) येथील श्री विठ्ठल रखुमाई मंदिराची १५० वर्षांची परंपरा असलेल्या अखिल भारतीय कीर्तन संस्थेतर्फे दरवर्षी कीर्तनाच्या परीक्षा घेतल्या जातात. चिपळूण येथील ह.भ.प. महेशबुवा काणे हे ह्या कीर्तन संस्थेला मार्गदर्शन करतात. सौ. विशाखा भिडे यांनी कीर्तन परीक्षेचा तीन वर्षे अभ्यासक्रम पूर्ण करून 'ए+' ही ग्रेड सुद्धा मिळवली ही विशेष कौतुकास्पद बाब आहे. दापोली, चिपळूण, मंडणगड, रत्नागिरी येथून ह्या अलंकार पदविकेचे शिक्षण घेण्यासाठी अनेकजण दरवर्षी सहभागी होत असतात. सौ. विशाखाताईंना पुण्यातून ह.भ.प. भास्कर घैसासबुवा, रत्नागिरीतील ह.भ.प. नाना जोशीबुवा ह्यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन ! भविष्यात उत्तुंग यशासाठी मनोमन शुभेच्छा !



*****

राष्ट्रसेविका समिती, रत्नागिरी जिल्ह्यासाठी ऑनलाईन कोणत्याही वाद्याशिवाय स्पर्धा नुकतीच घेण्यात आली. राणी लक्ष्मीबाई जयंतीचे निमित्त ह्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. १६ ते ३५ वयोगटासाठी ह्या स्पर्धा झाल्या. ह्या स्पर्धेमध्ये कु. गौरी दिवाकर भिडे, दापोली हिला तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे कु. गौरीचे हार्दिक अभिनंदन व उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा !



*****

सौ. माधवी (भिडे) जोगळेकर, मुंबई यांना कार्तिक एन्टरटेनमेंट कडून घेतलेल्या ऑनलाईन स्पर्धेमध्ये 'ती फुलराणी' ह्या नाटकातील स्वगत सादर करून त्यांना द्वितीय क्रमांक मिळाला. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान-तर्फे सौ. माधवी जोगळेकर यांचे हार्दिक अभिनंदन !



## आजीव सभासदांसाठी निवेदन

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची घटना कलम क्रमांक १०.१, ११.१ आणि २३.६ प्रमाणे विश्वस्त कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची निवड निवडणूक प्रक्रियेद्वारे २०२०-२१ ह्या वर्षामध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये प्रत्यक्ष होणे अपेक्षित होते. परंतु संपूर्ण देशामध्ये फैलावलेल्या 'कोविड-१९' ह्या महामारीमुळे आजपावेतो सुद्धा शासकीय निर्बंध, सरकारी धोरण आणि महामारीचा कमी-जास्त होणारा प्रादुर्भाव लक्षात घेऊन तसेच सद्य परिस्थितीत सुरू असलेल्या 'कोविड-१९' ह्या महामारीमुळे अनिश्चितता आहे आणि वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासाठी अनुकुल परिस्थिती नाही. त्यामुळे सध्या कार्यरत असलेले कार्यकारी विश्वस्त मंडळ जास्तीत जास्त सप्टेंबर २०२१ पर्यंत अथवा त्या अगोदर नवीन कार्यकारी विश्वस्त मंडळ अस्तित्वात येईपर्यंत मुदतवाढ घेण्यात येईल असे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून मा. धर्मादाय साहेब, मुंबई ह्यांना पत्राद्वारे विनंती करून कळवित आहोत. त्यासंबंधीचा तपशील शासकीय निर्बंध आणि शासकीय धोरणाला अनुसरून परिस्थितीनुरूप होत असलेले निर्णय आपल्यापर्यंत पोचविले जातील याची सर्व आजीव सभासदांनी नोंद घ्यावी.

कार्यकारिणीच्या आदेशान्वये.

- नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान करिता

**अध्यक्ष/सचिव**

आपले आजीव सभासद श्री. शरद नारायण भिडे, पुणे यांचे चिरंजीव श्री. संदीप ह्याचे वैद्यकीय उपचारासाठी तातडीची मदत म्हणून रु. १० हजार वैद्यकीय मदत निधीतून देण्यात आले.

## आदरांजली !

प्रसिद्ध संगीतकार व भिडे कुल बंधू श्री. नरेंद्र सदाशिव भिडे यांचे दिनांक १० डिसेंबर २०२० रोजी पुण्यात हृदयविकाराने निधन झाले. एक उदयोन्मुख संगीतकार म्हणून त्यांची ओळख होती. बी.ई. सिव्हिल इंजिनिअर असून सुद्धा स्वतःच्या आवडीचा 'संगीत' हा व्यवसाय निवडला आणि स्वतःच्या कर्तृत्वावर हा तरुण एक महान संगीतकार झाला ह्याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे. विशेष म्हणजे ह्यांना सर्व वाद्ये वाजविता येत होती. गळ्यात स्वर होता. मनोरंजन, विश्वास, पाऊल ठेवल्यावर, अवंतिका, पाऊलवाट, देऊळबंद, पेईंग गेस्ट, बायोस्कोप, रानभूल, चि. व चि.सौ.कां. यांसारख्या अनेक चित्रपटास त्यांनी दिलेली मधुर गाणी प्रेक्षकांच्या मनात आणि ओठात रुजवली. लव्हबर्डस् या थ्रिलर मराठी नाटकाचे पार्श्वसंगीतही त्यांनी दिले होते. मुळशी पॅटर्न या चित्रपटात त्यांची भूमिकासुद्धा सर्वांना माहीत आहे, तर येऊ घातलेल्या सरसेनापती हंबीरराव या सिनेमातही ते काम करीत होते. पुण्यामध्ये त्यांच्या डॉन स्टुडिओचे ते संगीत संयोजक आणि संचालक म्हणून कार्यरत होते. आपल्या संगीतातून त्यांनी आधुनिक व शास्त्रीय सुरांना शिखरावर नेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा आपले कौशल्य सिद्ध केले. मनाप्रमाणे काम केले तर ते लोकांपर्यंत पोहोचते असे ते नेहमी सांगत असत. ३० नोव्हेंबर २००३ रोजी सांगली भिडे संमेलनात त्यांना कला पुरस्कार प्रदान केला होता. ह्याशिवाय केशवराव भोळे पुरस्कार, अष्टपैलू पुरस्कार, यत्न पुरस्कार ह्या सारखे अनेक पुरस्कार प्राप्त होते. आपल्या कर्तृत्वाच्या ताकदीवर तरुण वयामध्ये व थोड्याच अवधीत नावलौकिक मिळवणारा संगीत दिग्दर्शक, एक अभिनेता आणि सदा हसतमुख असणारे व्यक्तिमत्त्व अचानक एक्झीट घेऊन गेले ही खंत आपल्या सर्वांना आहे. सरतेशेवटी ईश्वरी सत्तेपुढे इलाज नाही. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात प्रतिष्ठान विश्वस्त कार्यकारी मंडळ आणि समस्त भिडे परिवार सहभागी आहोत. परमेश्वर श्री. नरेंद्र भिडे यांना चिरशांती देवो हीच प्रार्थना.



# विडंबन

## मूळ चित्रपट - ते माझे घर

*आपण सर्वांनी श्री. रवींद्र भट यांनी लिहिलेले व श्री. सुधीर फडके यांनी गायलेले व संगीतही दिलेले गाणे 'श्रमिक हो घ्या इथे विश्रांती' हे गाणं ऐकलं असेलच. त्याच्या रचनाकार, गायक व संगीतकार ह्यांच्या प्रति पूर्ण आदर राखून व त्यांची क्षमा मागून त्याचं एक वेगळं रूप मी सादर करतो आहे.*

कोरोनाच्या संसर्गाने
किती विझती प्राणज्योति,
श्रमिक हो घ्या घरीच विश्रांती
कोरोनाची गडद सावली
अनाथ होती मुले माऊली
दिसे कधी का उघड्या डोळी
दानव हे शरीरातच नांदती
श्रमिक हो घ्या घरीच विश्रांती
नित्य स्मरुनी विठुरायासी
देऊ उभारी मना मनासी
तोडू साखळी विषवल्लीची
देऊया वेदनेस विस्मृती
श्रमिक हो घ्या घरीच विश्रांती
दार ठेवता सताड उघडे
घरा घराचे स्वास्थ्य बिघडे
प्रशासनाचे आम्हा साकडे
आम्हास ते पुन्हा पुन्हा सांगती
श्रमिक हो घ्या घरीच विश्रांती
श्रमिक हो घ्या घरीच विश्रांती

***

*श्री. यशवंत देव ह्यांची क्षमा मागून मी एक विडंबन सादर करतो आहे.*

## मूळ चित्रपट - कामा पुरता मामा

जीवनात हा गडी असाच राहू दे,
लॉकडाऊन नंतरही हाच टिकू दे...
रंगविले मी स्वप्नात, चित्र देखणे
आवडले वेडीला, तुझे घासणे
हात तुझा रांगडा कढईस लागू दे ...
जीवनात हा गडी...
तुला असे छळण्याचा छंद आगळा,
अनुभवाचा त्याविण का अर्थ वेगळा
भांड्यांचे अंग अंग स्वच्छ होऊ दे...
जीवनात हा गडी...
पाहू दे असेच तुला नित्य घासता,
जाऊ दे असाच काळ लॉकडाऊनचा
साबण व पैशांची बचत होऊ दे...
जीवनात हा गडी असाच राहू दे
लॉकडाऊन नंतरही हाच टिकू दे...

## मूळ चित्रपट - आम्ही जातो आमुच्या गावा

*दीड महिन्याच्यावर चालू असलेल्या लॉकडाऊनमुळे तळिरामांची खूपच पंचाईत झाली आहे. देशाला व राज्यांना मदिरेपासून खूप महसूल मिळतो म्हणून बार उघडावेत अशी सूचना एका राजकीय पुढाऱ्याने केली व यावर जोरदार चर्चा सुरू झाली. व्यंगचित्रकार ज्याप्रमाणे व्यंगचित्र काढतो त्याप्रमाणे तळिरामांच्या सद्य स्थितीवर एक व्यंगात्मक काव्य करावं असं वाटून एक काव्य केलं आहे. १९६८ च्या गाजलेल्या मराठी चित्रपटातील एक गाणं जे कै. जगदीश खेबुडकर यांनी लिहिलंय व कै. बाबूजींनी संगीत देऊन स्वतः गायलंय त्याचा आधार म्हणून वापर केला आहे. हे विडंबन नाही तरी काही शब्द व चाल मूळ गाण्यासारखी ठेवल्याने साधर्म्य जाणवतं. यास्तव मूळ गाण्याप्रती पूर्ण आदर, श्रद्धा ठेवून व गीतकार, गायक व संगीतकार आणि त्यांचे नातलग यांची क्षमा मागून हे सादर करीत आहे.*

संपली शिदोरी, संपला रे ठेवा
उघड बार भावा आता उघड बार भावा॥
पिते दूध मुकाट्याने जात बेवड्यांची
परी विसरावी कैसी चव मदिरेची
सरावल्या जिभांनाही कंड का सुटावा
उघड बार भावा आता.....॥१॥
उजेडात करिती पुण्य, अंधारात पाप
प्रत्येकाच्या हाती आहे एक छोटे माप
आठवड्यातून एकदा तरी एक 'लार्ज' मिळावा
उघड बार भावा आता.....॥२॥
स्वार्थ म्हणे बार मालक असावा शेजारी
उघडावा बार त्याने आपुल्याच घरी
बार मालकांचे हाती घडो लोकसेवा
उघड बार भावा आता.....॥३॥
संपली शिदोरी संपला रे ठेवा
उघड बार भावा आता उघड बार भावा
उघड बार भावा आता उघड बार भाव

**श्री. चिंतामणी भिडे,** ठाणे
८२९१३४१७७२

# मुंज

मौजीबंधन हे अर्णवचे।
करण्या जमले नात्यागोत्याचे॥
आनंद सोहळा चालला।
जमुनी सारा थाट केला॥
आर्जव केले गणरायाला।
कार्य होऊ दे पूर्ण सिद्धीला॥
कुलदीपक हा भिडे कुलाचा।
सार्थकी होऊ दे श्रेयस, मासुमाचा॥
पित्याने घेतले मांडीवरती।
मंत्र सांगितला गुरुगृही जाण्यासाठी॥
मातृभोजन हे झाले बटुचे।
मिळोत अशीच आर्शिवचने॥
हौसमौज दोन्ही आर्जीची।
लगबग चाले दोन्ही आजोबांची॥
भिक्षावळ ही घोड्यावरुनि।
थाट केला मामा मामींनी॥
- सौ. शिल्पा भिडे, मालाड
मो. ९९३०९०५५६३

## सूचना

**आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती...**

**ठाणे जनता सहकारी बँक लि;**
**सदाशिव पेठ शाखा, पुणे-30.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**
अकौंट नंबर -
**018110100001294**
IFSC Code -
**TJSB0000018**

विशेष सूचना -
रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना **9657541236** या क्रमांकावर किंवा **office@bhidekul.in** ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

# भिडे प्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

## जानेवारी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. श्रीकांत प्रभाकर भिडे, रोहा | १ |
| २. | श्री. प्रभाकर शंकर भिडे, सोलापूर | १ |
| ३. | श्री. विश्वनाथ दिवाकर भिडे, पुणे | १ |
| ४. | श्री. केदार विनय भिडे, पुणे | १ |
| ५. | श्री. वसंत मोरेश्वर भिडे, पुणे | ३ |
| ६. | श्रीमती वीणा वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ७. | श्री. मिलींद संतोष भिडे, सांगली | ५ |
| ८. | श्री. चिन्मय श्रीकृष्ण भिडे, पुणे | ६ |
| ९. | श्री. प्रभाकर महेश्वर भिडे, कणकवली | ६ |
| १०. | श्री. कौस्तुभ प्रदीप भिडे, डोंबिवली | ६ |
| ११. | श्री. गजानन सदाशिव भिडे, पुणे | ९ |
| १२. | सौ. चित्रा विजय भिडे, भोपाळ | ११ |
| १३. | श्री. संदीप कृष्णराव भिडे, बेळगांव | ११ |
| १४. | श्री. प्रसन्न भास्कर भिडे, मुंबई | १२ |
| १५. | सौ. सुकृता संदीप भिडे, अंमळनेर | १२ |
| १६. | श्री. विलास विठ्ठल भिडे, देवगड | १३ |
| १७. | श्री. मकरंद दत्तात्रय भिडे, पंढरपूर | १४ |
| १८. | डॉ. विजय कृष्णा भिडे, भोपाळ | १५ |
| १९. | सौ. शैलजा अरविंद वाडदेकर, पुणे | १५ |
| २०. | डॉ. विवेक यशवंत भिडे, रत्नागिरी | १६ |
| २१. | श्री. कैलास जगदीश भिडे, मुंबई | १९ |
| २२. | श्री. नारायण वसंत भिडे, जबलपूर | २० |
| २३. | श्री. मंदार श्रीकृष्ण भिडे, पुणे | २२ |
| २४. | सौ. विद्या विकास भिडे, सांगली | २२ |
| २५. | श्री. प्रसाद माधव भिडे, माभळे | २२ |
| २६. | श्री. उमेश विठ्ठल भिडे, ठाणे | २३ |
| २७. | श्रीमती कुसुम नारायण नगरकर, पुणे | २४ |
| २८. | श्री. प्रतापसिंह विष्णुपंत भिडे, नाशिक | २४ |
| २९. | सौ. विद्या चिंतामणी भिडे, ठाणे | २५ |
| ३०. | श्री. विलास राजाराम भिडे, मुंबई | २५ |
| ३१. | श्री. मधुकर शंकर भिडे, रायगड | २६ |
| ३२. | श्रीमती मनाली मंदार भिडे, पुणे | २८ |
| ३३. | श्री. परीक्षित सुहास भिडे, पुणे | ३० |
| ३४. | श्री. अरुण शंकर भिडे, बोरिवली | ३१ |

## फेब्रुवारी

| | | |
|---|---|---|
| १. | कु. राजस प्रदीप भिडे, पुणे | २ |
| २. | श्री. संजय दत्तात्रय भिडे, कोल्हापूर | ३ |
| ३. | श्री. सारंग शरद भिडे, पुणे | ५ |
| ४. | श्री. मंदार भगवान भिडे, रत्नागिरी | ७ |
| ५. | श्री. विजय अरविंद भिडे, पुणे | ८ |
| ६. | श्री. विद्याधर शंकर भिडे, डोंबिवली | ८ |
| ७. | श्री. शरद नारायण भिडे, पुणे | ९ |
| ८. | सौ. गौरी श्रीगणेश जोगवेकर, कल्याण | ९ |
| ९. | श्री. निनाद दत्तात्रय भिडे, ठाणे | ९ |
| १०. | कु. ईरा हर्षवर्धन भिडे, पुणे | १० |
| ११. | श्री. विश्वनाथ रघुनाथ भिडे, कामशेत | १० |
| १२. | श्री. जयंत शंकर भिडे, ग्वाल्हेर | ११ |
| १३. | सौ. मृणाल शार्दुल भिडे, पुणे | १२ |
| १४. | सौ. सुजाता प्रसन्न भिडे, मुंबई | १३ |
| १५. | सौ. कल्पना संजय भिडे, माणगांव | १५ |
| १६. | श्री. विकास कृष्णाजी भिडे, कल्याण | १५ |
| १७. | श्री. प्रसाद प्रसन्न भिडे, पुणे | १५ |
| १८. | सौ. गौरी हर्षवर्धन भिडे, पुणे | १७ |
| १९. | श्री. उदय गजानन भिडे, देवरुख | १७ |
| २०. | श्री. श्रीराम वामन भिडे, पुणे | १८ |
| २१. | श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, ठाणे | १९ |
| २२. | श्री. अमित प्रकाश भिडे, डोंबिवली | १९ |
| २३. | श्री. विनायक केशव भिडे, रायगड | २० |
| २४. | श्री. संतोष सखाराम भिडे, डोंबिवली | २० |
| २५. | श्री. सागर गजानन भिडे, सांगली | २० |
| २६. | श्री. वसंत नरहर भिडे, ठाणे | २१ |
| २७. | श्रीमती सुलभा दिनकर भिडे, कल्याण | २२ |
| २८. | श्री. प्रकाश प्रभाकर भिडे, माभळे | २३ |
| २९. | श्री. बाळकृष्ण दामोदर भिडे, पुणे | २४ |
| ३०. | सौ. मानसी मुकुंद भिडे, बेळगांव | २५ |
| ३१. | श्री. माधव आनंद भिडे, डोंबिवली | २५ |
| ३२. | आकांक्षा आशिष भिडे, नालासोपारा | २६ |
| ३३. | श्री. विक्रांत दिलीप भिडे, पुणे | २७ |
| ३४. | ॲड. विनोद यशवंत भिडे, औरंगाबाद | २७ |
| ३५. | आशिष धुंडिराज भिडे, नालासोपारा | २८ |

## मार्च

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रसाद रमेश भिडे, कल्याण | १ |
| २. | श्री. मिलींद सोमेश्वर भिडे, बडनेरा | १ |
| ३. | सौ. अंजली विवेक भिडे, सांगली | २ |
| ४. | कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रोहा | ४ |
| ५. | सौ. प्रज्ञा संतोष भिडे, ठाणे | ४ |
| ६. | सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर | ५ |
| ७. | श्री. काशिनाथ लक्ष्मण भिडे, सोलापूर | ७ |
| ८. | श्री. अमित ए. भिडे | ७ |
| ९. | श्री. मिलींद मुकुंद भिडे, पुणे | ७ |
| १०. | श्री. सुधीर केशव भिडे, पुणे | ८ |
| ११. | सौ. शकुंतला मधुकर भिडे, रायगड | १० |
| १२. | श्री. विश्वनाथ गोविंद भिडे, पुणे | ११ |
| १३. | कु. वेदांगी दिलीप भिडे, पुणे | १४ |
| १४. | सौ. रोहिणी प्रभाकर भिडे, पुणे | १५ |
| १५. | श्रीमती वनिता नरसिंह भिडे, पुणे | १५ |
| १६. | सौ. मधुरा महेश भिडे, पनवेल | १५ |
| १७. | श्री. बाळकृष्ण ल. भिडे, कर्नाटक | १६ |
| १८. | श्री. सुदर्शन सुरेश भिडे, पुणे | १६ |
| १९. | श्री. शरद शंकर भिडे, सांगली | १७ |
| २०. | श्री. सुनील वामन भिडे, पुणे | १७ |
| २१. | सौ. अनुराधा नरेंद्र भिडे, सांगली | १८ |
| २२. | श्री. संजय भिडे, मुंबई | १९ |
| २३. | श्री. शिरीष सुरेश भिडे, उत्तरप्रदेश | २० |
| २४. | श्री. दिनानाथ पांडुरंग भिडे, गुजराथ | २३ |
| २५. | श्री. एम. उपेंद्र भिडे, बेंगलोर | २४ |
| २६. | श्री. मा. य. भिडे, हैद्राबाद | २५ |
| २७. | श्री. अक्षय चारुदत्त भिडे, माभळे | २७ |
| २८. | सौ. स्वाती अजय भिडे, पुणे | ३० |
| २९. | सौ. आशा अनिल भिडे, भोपाळ | ३० |
| ३०. | श्री. महादेव जनार्दन भिडे, मुंबई | ३० |
| ३१. | श्री. अभिषेक विजय भिडे, पनवेल | ३१ |
| ३२. | सौ. राधिका श्रीधर रानडे, पुणे | ३१ |
| ३३. | श्री. अमोल शशिकांत भिडे, पुणे | ३१ |

# एका सर्वसामान्य नागरिकाचे मनोगत

गेले काही महिने म्हणजेच 'कोरोना' हा प्राणी आपल्या दारात येऊन उभा राहिला तेव्हापासून आपण सगळेच जण काही वेळा एकमेकांशी भावनिक पातळीवर जोडले गेलो तर काही वेळा सर्वच बाबतीत दुरावलो पण. ह्या सगळ्या कठीण काळात (मार्चपासून सुरू झालेल्या आणि कधी संपेल माहीत नसलेल्या) अढळपणे, ठामपणे पाय रोवून उभा राहिला तो पोलीस आणि आरोग्य कर्मचारी (डॉक्टर्स, नर्सेस, सफाई कर्मचारी) हा दमला असेल, ह्याचे पण पाय दुखत असतील, हिला वेळेवर जेवायला मिळाले असेल का ? ह्यांच्या घरचे किती काळजी करत असतील ? केवढा अभिमान वाटत असेल त्यांना ह्या 'कोरोना योद्धांचा' असे किती तरी प्रश्न, अगणित विचार मनात घोळत होते. ह्या मंडळींचा त्रास कमी व्हावा म्हणून आपण काय करू शकतो ? घरात राहून मदत करायची की पुढे होऊन त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहायचे ? पुन्हा प्रश्न. तशातच पोलिसांबरोबर स्वयंसेवक म्हणून काम करायची संधी मिळाली. त्यांचे चोवीस तासांचे न थकता, न चिडता, समोर आलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या अडीअडचणी सोडवण्याचे अव्याहतपणे चालणारे काम जवळून पाहता आले. आपोआप त्यांच्याशी मनाने जोडले गेलो. कधी त्यांच्यातलाच एक भाग झालो ते कळलेच नाही. त्यांचीच भाषा घरीदारी आपसूकच वापरायला लागलो. चांगल्या कामाबद्दल प्रशंसा झाली त्यापेक्षा त्यांच्यावर शिव्याशापांचा भडिमारच जास्त झाला. कायदा आणि सुव्यवस्था, शिस्त राखण्यासाठी लोकांचे वाईट-साईट बोलणे संयमाने ऐकताना आमचा संयम सुटत चालला होता. लॉकडाऊनमुळे हप्ता खाण्याचा धंदा बंद झाल्यामुळे पोलीस दंड वसूल करतायत हे ऐकल्यावर तर तळपायाची आग मस्तकात जात होती. हे सर्व अनुभवताना एक शंका, अनेक प्रश्न नेहमीप्रमाणे डोळ्यांसमोर नाचत होते. पोलिसच का ? सर्व कामांसाठी पोलिसच का ? कायदा व सुव्यवस्था राखण्याचे त्यांचे काम असताना लोकांना किराणा, भाजीपाला, औषधे, दूध आणि अशी अजून मदत पण त्यांनी केली. हे काम खरच त्यांचे होते ? महाराष्ट्रा बाहेरील लोकांना (श्रमीक, मजूर) व्यवस्थित रेल्वे, बसची सोय लावण्याचे काम त्यांनी केले. हे काम खरच पोलिसांचे होते ? दिलेली सर्व कामे त्यांनी पूर्ण ताकदीनिशी पार पाडली. हे करताना कितीतरी पोलीस 'कोविडने' आजारी पडले, काहीजणांचा मृत्यू झाला तरी मागे हटले नाहीत. कारण काय ? ह्या बद्दल जेव्हा पोलिसांशीच संवाद साधला, आमच्या शंका विचारल्या तेव्हा त्यांनी मोजकेच शब्द सांगितले. त्या शब्दांत किती अर्थ भरला आहे हे विचार केल्यावरच कळते. खाकी वर्दी, वर्दीवरचा विश्वास, वर्दीतील शिस्त, बास फक्त एवढेच त्यांनी सांगितले आणि आम्ही स्तब्धच झालो. किती खरे आहे ना ?

हाताची पाच बोटे सारखी असतात का ? नाही ना ? तसेच प्रत्येक व्यक्ती वेगळी असते. बहुतेक सर्व घरांतून एक हूड, द्वाड, खोडसाळ मूल असतेच म्हणून घरातील बाकीची मंडळी वाईट होत नाहीत. तसेच काहीसे ह्या खात्याचे पण आहे. घरातील मधल्या मुलांचे/मुलींचे कसे असते ना मोठ्यांचेही ऐका आणि लहानांचे पण, तसेच पोलिसांचेही असते की. वरिष्ठांचेही ऐका आणि सामान्य जनतेचेही ऐका. त्यांना त्यांचे नेमून दिलेले काम करावेच लागते ते पण कायद्याच्या चौकटीत. ऊन, पाऊस, थंडी, वारा झेलत. सणसमारंभ, घरदार, कुटुंब त्यांनाही आहे. कितीही कंटाळा आला असला, थकला दमला असला तरी हातातला घास खाली ठेवत कामावर हजर व्हावे लागते. मनाविरुद्ध कर्तव्यकठोर व्हावे लागते. हे सर्व पोलीस काय किंवा संरक्षण खात्यात काम करणारा प्रत्येक व्यक्ती, जवान स्वतःसाठी करत असतो. तुमच्या आमच्यासाठी. दिवसेंदिवस ह्या खात्याबद्दल आदर वाढतच राहिला. कधी चेष्टामस्करी करत, कधी आमच्याशी मनातले बोलून मन मोकळं करीत, आम्हाला त्यांच्यातलेच एक समजत आमची मदत घेत, हक्काने चहा कॉफी मागत, कधी आमच्यात मैत्रीचे बंध निर्माण झाले ते कळलेच नाही. ह्या सहा-सात महिन्यांत ह्या सर्वांनी आख्ख्या शहराची काळजी ज्या प्रकारे घेतलीय त्याला तोड नाही. कोठून आणले हे बळ, ही ताकद ? वेडेवाकडे शब्द बोलणाऱ्या लोकांनी एकदा तरी पोलिसांचे आयुष्य जगून बघावे. काही दिवसांसाठी तरी. तसे नसेल करायचे तर किमान आपली बेपर्वा वृत्ती, बेफिकिरी तरी कमी करूयात. स्वयंशिस्त पाळूयात. हे सर्वजण शहराची सुरक्षितता जपतायत आपण त्यांची काळजी घेऊयात. बेदरकार, बेजबाबदार व्यक्ती किंवा माणूस, नागरिक म्हणवून घेण्यात कसला आलाय अभिमान ? गर्वाची बाब तर निश्चितच नाही. थोडा विचार करा, तेवढे आपण सगळे सुज्ञ, सुशिक्षित, सुसंस्कारित नक्कीच आहोत.

**- सौ. कीर्ति नरेंद्र देव (भिडे)**, पुणे
मो. ९९७५६१३७१२

## ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० देणगीदारांची यादी

| | | रक्कम रुपये | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मिलींद दिगंबर भिडे, छत्तीसगड | १०,००० | विवाह मदत देणगी |
| २. | श्रीमती सिमंतीनी बबन भिडे, माहीम | ३,००० | देणगी |
| ३. | श्री. मिलींद सोमेश्वर भिडे, बडनेरा, अमरावती | १,००० | आजीव सभासद |
| ४. | कु. मधुरा मिलींद भिडे, बडनेरा, अमरावती | १,००० | आजीव सभासद |
| ५. | श्री. अरुण शंकर भिडे, बोरिवली | १,००० | वाढदिवस देणगी (चि. अमेय ) |

### नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
### विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !

**जानेवारी**

| | |
|---|---|
| श्री. सतीश व सौ. स्मिता भिडे, पुणे | २-१-१९८१ |

**फेब्रुवारी**

| | |
|---|---|
| श्री. प्रदीप व सौ. गौरी भिडे, डोंबिवली | १९-२-१९९५ |
| श्री. उमेश व सौ. अपर्णा भिडे, ठाणे | २४-२-१९७३ |

**मार्च**

| | |
|---|---|
| श्री. दिलीप व सौ. वर्षा भिडे, पुणे | १२-३-१९८५ |
| श्री. राजेंद्र व सौ. संपदा भिडे, दादर | २३-३-१९९८ |

लेखांक : भाग ५

# एक साहस योग - लेह - लडाख

सौ. नेहा किरण सातर्डेकर (भिडे)
मो. ९००४०७८४३३, डोंबिवली

आमच्या लेह लडाख ट्रिपचे अजून एक मुख्य आकर्षण Pangong lake ला आमची पुढची टूर होती. आदल्या दिवशी गाडीचा काही मायनर प्रॉब्लेम झाल्याने गाडी दुरुस्त होऊन उशिरा आली आणि आम्ही ९.३० नंतर Pangong lake च्या दिशेने निघालो. आम्ही चांग-ला पास या जगातल्या सेकंड हायेस्ट मोटोरेबल रोडने जाणार होतो. त्याची उंची १७५०० फूट आहे. खारदूंगला पास नंतर चांग-ला पासचा नंबर लागतो. लेह मनाली हायवेने जाताना Shey या गावात आम्ही एका भन्नाट जागेला भेट दिली Rancho's School या नावाने जगप्रसिद्ध झालेली शाळा म्हणजे 'Druk While Lotus School' ला आम्ही भेट दिली. प्रत्यक्ष शाळा बघता येत नाही कारण तशी परवानगी नाहीये. (टुरिस्टस्मुळे मुलांना डिस्टर्ब होतं म्हणून) पण जिथे '३ इडियट्स' मूव्हीचं शूटिंग झालं होतं तिथं एका भिंतीजवळ आम्हाला जाता आलं. थ्री इडियट्सचे काही सीन्स तिथे पेंट करून ठेवले आहेत. आम्ही तिथे त्याच पोझेसमध्ये फोटो काढून घेतले आणि थ्री इडियट्सची मजा आठवून खूप हसलो. तिथे टीशर्टस्, सोवेनियर्स असं सगळं विकत मिळतं. आम्ही लेह-मनाली हायवे सोडून चांग-ला पासच्या दिशेने एकेक डोंगर वर चढू लागलो. चांग-ला जाण्याचा रस्ता अजिबातच चांगला नव्हता. (अगदी खराब होता) म्हणजे त्यापुढे खारदुंगलाचा रस्ता चांगला म्हणायची वेळ आली. अशक्य खडबडीत, अरुंद, रस्त्यावर दगड गोटे घसरून आलेले आणि काही ठिकाणी तर चक्क रस्ता गायब. तिथे एखादा ओढा किंवा झरा ज्याचे खडबडीत मोठाले दगड ज्यावरून गाडी काढावी लागायची. वर वर चढत जाऊ तसा रस्ता अजूनच खराब होता. साधारण २ एक तासांनी चांग-ला पासला पोचलो पण आम्ही खारदुंगलाला सरावल्यामुळे त्या दिवशी सारखा त्रास नव्हता किंवा थंडी सुद्धा कमी जाणवत होती. अर्थात दम लागत होताच पण तरीही नेहमीप्रमाणे फोटो सेशन करून आम्ही पुढे सरकलो. मजल दरमजल करीत आम्ही लंचसाठी एका छोट्या गावात थांबलो. एक छोटंसं हॉटेल होतं जिथे तो मालकच एकटा शेफ, वेटर अशा भूमिकेत होता आणि शिवाय तो आमच्या ड्रायव्हरचा भाऊ होता म्हणून त्याने आमची गाडी तिकडेच थांबवली. गंमत म्हणजे या पठ्ठ्याने पटापट ऑर्डर घेऊन आपल्या भावाला स्वयंपाकात मदत करून ९ जणांची ब्रेड-ऑम्लेट, आलू पराठा, मॅगी, लेमन जिंजर टी अशी सगळी ऑर्डर अवघ्या अर्ध्या तासात पूर्ण केली आणि आमचा अग्नी शांत केला. त्या गावापासून पुढे अगदी मख्खन रास्ता होता. तरीही आमचा अत्रंग ड्रायव्हर त्यातून पण शॉर्टकट काढून अधून मधून मुद्दाम आम्हाला खराब रस्त्याने नेत होता. नेहमीसारखेच अनेक डोंगर चढत उतरत आम्ही पेंगाँगच्या जवळपास पोचलो. रस्त्यात मिलिटरीचे किमान २५-३० कॉन्व्हॉय (मिलिटरीच्या मालवाहू ट्रक्सचा ताफा किंवा तांडा ज्याला कॉन्व्हॉय म्हणतात) दिसले की आमचा ड्रायव्हर इमाने इतबारे थांबून त्यांच्यासाठी वाट मोकळी करून द्यायचा कारण रस्ते एवढे अरुंद असतात की प्रथम त्यांना प्रायोरिटी देऊन मगच आपण जाऊ शकतो. पेंगाँगच्या दर्शनासाठी तहानलेले आम्ही, अनेक वळणे आणि डोंगर पार करून खरे तर कंटाळलो होतो आणि रस्ताही फार काही देखावे दाखवणारा नव्हता. रस्त्याच्या दुतर्फा डोंगर आणि गवताळ कुरणं होती. आमच्या ड्रायव्हरने अचानक मध्येच गाडी थांबवली आणि म्हणाला हा बघा मार्मोट नावाचा प्राणी. आपल्या खारुताईच्या प्रजातीत मोडणारा हा प्राणी, दिसतो पण थोडासा तसाच आणि फक्त इथेच बघायला मिळतो. आम्ही फोटो काढायला पुढे सरसावलो मात्र आणि तो लगेच त्याच्या बिळात गुडुप झाला. थोडं मागे हटून आम्ही दबा धरून बसलो तर लगेच वर आला आणि मग त्याच्या थोडं मागे पाहिलं तर असे २-३ मार्मोट एकमेकांशी मारामारी करत बसले होते. आम्हाला एवढं मस्त वाटलं ना ते दृश्य बघून, आपले टॉम ॲण्ड जेरी आठवले आणि आम्ही खूप हसलो. ड्रायव्हरच्या सांगण्यावरून आता समोर जी डोंगरांची रांग दिसतेय त्याच्या पलीकडे पेंगाँग दिसेल असं करत करत आम्ही अनेक डोंगर पार केले. अखेर आमची नजर ज्या अपूर्वाईचा शोध घेत होती तो लेक २ डोंगररांगांच्या मध्ये आम्हाला दिसू लागला आणि आम्ही हुर्रे करून ओरडलो. बघता बघता सफाईदार वळणे घेत आम्ही लेकच्या अगदी जवळ पोचलो आणि बघतो तो काय समोर नजर ठरणार नाही इतक्या दूरपर्यंत विस्तीर्ण पसरलेला पेंगाँग जलाशय आमच्या थेट डोळ्यांसमोर. ड्रायव्हरने आम्हाला काठावर सोडलं आणि तो आमचे टेंटस् कुठे आहेत ते शोध घ्यायला गेला. आज एकूणच एकदम एक्सायटींग डेस्टीनेशन होतं. पेंगाँग लेक, टेंट मधला स्टे, अद्भुत रोमांचकारी अनुभवांची नांदी झाली जणू. समोरच थ्री इडियट्स फेम करीना पोझ देण्यासाठी स्कूटर्स आणि ३ बम्प सीट्स ओळीने मांडल्या होत्या. शिवाय बुलेट सुद्धा होती. तिथल्या स्थानिकांनी कमाईचा हा एक नवा मार्ग शोधून काढला होता. प्रत्येक ठिकाणी बसून अनलिमिटेड फोटो काढा, करीना स्कूटर आणि बाईकला १००-१५० रुपये प्रत्येकी आणि ३ बम्पस् वर रुपये ५० प्रत्येकी. झालं ! सगळ्या हौशी लोकांनी यथेच्छ फोटो काढून पुढच्या काही महिन्यांसाठी प्रो-पिकची तजवीज करून ठेवली. थोडंसं खाली उतरून आम्ही लेकच्या काठाशी पोचलो. इतकं नितळ आणि स्वच्छ पाणी की काठावरच्या पाण्याचा तळ आणि त्याखालचे दगडगोटे अगदी लख्ख दिसत होते. खाली बसून त्या बर्फगार पाण्याला स्पर्श केला आणि अलगद ओंजळीत भरून तो स्पर्श मन भरून साठवण्याचा प्रयत्न केला. एक वेगळीच लहर उठली अंतरंगात आणि नकळत त्या पवित्र जलाशयाला नमस्कार केला गेला. जगाच्या पाठीवर भारतात लेह-लडाखच्या सगळ्यात उंच भूतलावर अवतरलेलं हे अभूतपूर्व आश्चर्य. १३४ किमी. लांबी असलेला हा विस्तीर्ण जलाशय फक्त एक तृतीयांश भारतात आणि उर्वरित दोन तृतीयांश चीनमध्ये प्रकट झाला आहे. जगातलं सगळ्यात जास्त उंचीवरचं खाऱ्या पाण्याचं सरोवर म्हणून पेंगाँग लेक ओळखले जाते. Pangong Tso-Tso म्हणजे तलाव, लडाखी लोकं होली लेक म्हणून याची पूजा करतात. हा लेक तिथे कसा तयार झाला, त्याचा उगम कुठून होतो याबद्दल काही आख्यायिका आहेत का हे काहीच माहीत नाही. हा लेक म्हण ४ रंग बदलतो म्हणजे दिवसाच्या वेगवेगळ्या प्रहरी त्याच्या वेगवेगळ्या रंगछटा दिसतात. आम्ही जेव्हा गेलो तेव्हा अंदाजे ४.३०-५ वाजले

होते. पण जरा ढगाळ वातावरण आणि मळभ होतं. भव्य पसरलेल्या त्या जलाशयात हिरव्या निळ्या छटांचे अगणित तरंग उठत होते आणि वाऱ्यावर हलकेच पाण्याच्या लहरी हेलकावे खात होत्या. नजर पोचणार नाही इतक्या दूरवर पसरलेला तो लेक आणि त्याच्या मागे अद्भुत रंगांचे असंख्य डोंगर, मागच्या उंच डोंगररांगा बर्फाच्छादित होत्या आणिपुढे मातकट, करड्या, राखाडी, हिरव्या, तपकिरी अशा अनेक रंगांचे डोंगर क्षितिजाची महिरप अजूनच देखणी करत होते. आकाशाचा हलका निळा रंग आणि पाण्याची गहिरी निळाई - आम्ही बेभान होऊन त्या अमूर्त सौंदर्याची अनुभूती घेत होतो. अचानक मळभ दूर होऊन लख्ख ऊन पडलं आणि पेंगाँग लेक अक्षरशः त्या सोनेरी उन्हात चमचम करू लागले. पृथ्वीरचं हे स्वर्गीय सौंदर्य न्याहाळताना इतके हरखून गेलो होतो की आनंदाचे चित्कार अगदी प्रत्येकाच्या तोंडून उमटत होते आणि आम्ही तो देखणा सोहळा 'याची देही याची डोळा' पाहिल्याचा अवर्णनीय आनंद तनामनात भरून घेत होतो. एक मंतरलेली संध्याकाळ अनुभवताना वेळ कसा गेला कळलंच नाही. ती सगळी अपूर्वाई फोनच्या कॅमेऱ्यात बंद करताना त्यातली प्रत्येक फ्रेम आम्हाला मोहवून टाकत होती आणि त्या आठवणी फोटोंमधून साठवून ठेवायला भाग पाडत होती. एव्हाना सूर्यास्त झाला होता आणि संधिप्रकाश पडला होता, आधीच भन्नाट वारा, त्यात थंडी वाढू लागली. आम्ही कुतुहलाने आमच्या तंबूकडे जायला निघालो आणि गाडीतून जाताना जमेल तेवढे फोटो काढून फोनची मेमरी फुल्ल करून टाकली.

आमचे तंबू साधारण १५ बाय १२ आकाराचे. पेंगाँग लेकच्या समोरच मोकळ्या सखल जागेत हे तंबू उभारले गेले होते. संपूर्ण कापडी हिरव्या रंगाचे २ जाड अस्तर असलेला तंबू, ज्याला जाळीदार पडदे होते, जे झिप लावून पूर्ण बंद करता येणारे, बाहेर २ खुर्च्या राहतील इतकी छोटी बाल्कनी, आत पुन्हा पूर्ण झिप लॉक करता येणारे जाळीचे पडदे, २ लोखंडी कॉट ज्यावर घट्ट जाड गाद्या आणि पांघरायला एक पातळ गादी आणि मऊ उबदार रजई इतका सगळा सरंजाम. आतमध्ये व्हरांडा आणि त्यात एक बेसिन, कमोड, नळ आणि बादली. अशी सगळी प्राथमिक सोय असलेला एक साधासा तंबू. थंडीपासून संरक्षण करू शकणारी अशी सगळी व्यवस्था पण वाऱ्याचं काय ? आम्ही बॅग्ज ठेवून बाहेर खुर्च्यांवर येऊन बसलो. पण छे ! तापमान १-२ पर्यंत खाली उतरलं होतं. वाऱ्याने आणि थंडीने पुरती वाट लागली आमची. एका वेळी अंगावर किमान ६ स्तर असतील एवढे कपडे. सॉक्स, शूज, हातमोजे, डोक्यावर माकडटोपी, कानात कापूस असा सगळा तामझाम असून सुद्धा आमची थंडी भागत नव्हती. बोचरा, भणाणणारा वारा अंगात हुडहुडी भरवत होता. शेवटी आम्ही दुसऱ्या मोठ्या तंबूत जाऊन बसलो जिथे जेवण्याची सोय होती. हा तंबू बऱ्यापैकी उबदार होता. गरम गरम सूप, रोटी सब्जी, दाल राईस आणि स्वीट असा सगळा मेनू. त्या कडाक्याच्या थंडीवाऱ्यात या सगळ्या लोकांनी हा एवढा स्वयंपाक कसा काय शिजवला असेल असा प्रश्न पडला. तिथे एक जम्मूहून आलेला राहुल सिंग नावाचा वेटर होता. ज्याने आम्हाला प्रेमाने आग्रह करून गरम गरम जेवण वाढलं. त्याच्याशी बोलताना कळलं की कामधंद्याच्या शोधात तो जम्मूहून इथे फक्त ४-५ महिन्यांकरिता आलेला होता. त्याची घरची परिस्थिती बेताची असावी. आईवडिलांना सोडून पहिल्यांदा कामासाठी बाहेर पडलेला राहुल एवढ्या दूर येऊन आमची सेवा करत होता, आम्हाला त्याचं खूप कौतुक वाटलं. त्याच्याशी थोड्या गप्पा मारून आम्ही लगेच आपापल्या तंबूमध्ये जाऊन बसलो. पेंगाँगला तर १० लाच लाईट बंद होतात. त्यामुळे लवकर गुडूप होण्याशिवाय पर्याय नव्हता. प्रवासाचा थकवा आणि थंडीवाऱ्यामुळे अंग मोडून आलं होतं म्हणून ब्लँकेट पांघरून आडवे झालो खरे पण एकदम मिट्ट काळोख झाला तशी थोडी भीती वाटू लागली. कारण जसजशी रात्र वाढत होती तसतसा वारा सुद्धा बेभान झाला होता. आमच्या तंबूचे वरचे कापडी छप्पर थाडथाड उडत होते आणि वाऱ्याच्या घोंगावणाऱ्या आवाजाने आम्हाला धडकी भरत होती. रात्री वाऱ्याने तंबूचे कापड उडून गेले तर ? तंबूच्या बांधलेल्या खुंट्या वाऱ्याने उडून तंबू अंगावर पडला तर ? अशा चित्रविचित्र शंकांनी मनात पिंगा घालायला सुरुवात केली. या विचारात कधी झोप लागली कळलं नाही पण अचानक १.३० जाग आली ते डोकं सणसणून दुखायला लागल्याने. वाऱ्याचा आवाज थोडा मंदावला होता त्यामुळे आणि ब्लँकेट, गादीच्या पुरेशा उबेने थंडी वाजत नव्हती पण तंबू सगळीकडून बंद आणि अंगावर कपडे, स्वेटर, ब्लँकेट याच्या ओझ्यामुळे जरा घुसमटायला लागलं. व्हेंटिलेशनची काही सोय नव्हती आणि त्यामुळे नाक चोंदल्यासारखं आणि गुदमरल्यासारखं वाटू लागलं. मोबाईलच्या प्रकाशात धडपडत उठून पाणी प्यायलं आणि पुन्हा झोपायला गेले तर कसलं काय डोकं अशक्य फुटू लागलं होतं. डोकं फुटून कवटी बाहेर येते की काय इतकी असह्य डोकेदुखी सुरू झाली. काल डायमॉक्स घेऊन पण हे असं काय होतंय या विचाराने थोडं टेन्शन येऊ लागलं. काही केल्या चैन पडेना, बाजूला बहीण झोपली होती, तिचं नाक चोंदलं होतं. त्यामुळे तिलादेखील अस्वस्थ वाटू लागलं. शेवटी ३.३० उठून मोबाईच्या प्रकाशात पेनकिलर शोधली आणि घेऊन टाकली तेव्हा कुठे जरा शांत झोप लागली. पेंगाँग लेकचा हा तंबू-वास्तव्याचा अनुभव एकूणच एकदम थ्रिलींग होता आणि आपण जणू काही ॲडव्हेंचर करतोय असा फील येऊन भारी वाटू लागलं. सकाळी ६.३० ला एकदम फ्रेश जाग आली, ते सकाळचं कोवळं ऊन पेंगाँगला अजूनच देखणं करत होतं. तंबूच्या बाहेर येऊन सूर्याच्या उजाडत्या प्रकाशात पेंगाँग लेकचे फोटो काढून घेतले. थंडी होतीच आणि वारा काही उसंत घेत नव्हता. जेवणाच्या तंबूत गरम चहा-नाष्ट्याची सोय होतीच आणि काय आश्चर्य आम्हाला इथे चक्क दाणे घातलेले पोहे मिळाले. शिवाय ब्रेड ऑम्लेट, पराठा हे पदार्थ होतेच. त्यावर मस्त ताव मारून राहुलचा प्रेमळ निरोप घेऊन तंबूत परत आलो. आम्हाला हातपाय धुवायला बादलीभर गरम पाण्याची सोय केली होती त्यामुळे अंघोळीची गोळी घेऊन पटकन आवरलं आणि निघालो. जाताना पुन्हा एकवार पेंगाँग लेकच्या दर्शनाचा मोह आवरता आला नाही. आज स्वच्छ सूर्यप्रकाशात लेकचं सौंदर्य अजूनच उठून दिसत होतं आणि काल जी हिरव्या-निळ्या रंगाची छटा लहरत होती ती आज मोरपिशी दिसू लागली होती आणि मध्येच करड्या-राखाडी रंगाची छटा दिसू लागली. म्हणजे आम्हाला जवळपास चारही रंग अनुभवता आले हे जाणवून खूप भारी वाटलं. खरं तर तिथून पायच निघत नव्हता पण जावं तर लागणारच होतं. पेंगाँगची आमच्यावर चढलेली भूल काही एवढ्यात उतरणार नव्हती, एक अद्वितीय अद्भुत सौंदर्य अनुभवल्याचं समाधान आणि तंबूतल्या वास्तव्याचा थरार अशा संमिश्र आठवणी तनामनात भरून घेऊन आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. **(क्रमशः)**

लेखन स्पर्धा २०२०-२१
लेख क्रमांक १

# टोपण नावाची गोष्ट

सौ. शिल्पा भिडे, मालाड (पू.), मुंबई
मो. ९९३०९०५५६३

खरे बघायला गेले तर हा विषय असा आपणहून सुचण्यासारखा नाही. पण हा विषयच दिला आहे म्हणून माझा स्वतःचा अनुभव लिहित आहे. लिखाण वगैरे कधी केले नाही म्हणून काही चुका असतील तर क्षमा असावी. मी सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे. माझे माहेरचे नाव कु. हेमा अनंत थत्ते. माझा जन्म, लहानपण सगळे मुंबईत आणि त्यातून वडील अनंत भास्कर थत्ते हे एअर इंडियात नोकरीला असल्यामुळे राहणे हे एअर इंडिया वसाहतीत. आजूबाजूला सर्व धर्म जातीचे राहणारे. शेजारी जरी जोशी, दामले, आठवले असले तरी मातृभाषेत शिक्षण झाले तरी हाय, हॅलो, हाऊ आर यू अशी बोलायची सवय. झाले, लग्नाचे वय झाल्यावर वर संशोधन सुरू. लग्न ठरले. सातारचे भिडे ह्या घरात. लग्नानंतर पुण्याच्या पुढे पहिल्यांदा प्रवास केला. तिथे गेल्यावर चार खोल्यांमध्ये राहायची सवय. तो मोठा वाडा, मोठे घर सगळेच मोठे. घरात खूप माणसे वावरतायत. कोणीतरी हाक मारली अरे किशा म्हणून मला कळेना हा किशा कोण ? तर माझेच पती म्हणजे नवरा. हे काय नाव ? श्रीकृष्ण म्हणतायत, कोणी किशा, कोणी किसन तर कोणी किशोर. मला वाटायचे हा किशोर कधीच म्हातारा होणार नाही का ? मला हसू यायचे. एवढा नावाचा विपर्यास का करतात ? माझ्या चुलत सासूबाई खूप छान कलाकार, मिष्किल स्वभावाच्या होत्या. माझी नक्कल करायच्या. अहो श्री... म्हणून हाका मारायच्या पण मी बघितले, सगळ्यांच्या नावांचा विचित्र शॉर्टकट मारायचा हे सगळे मला नवीन होते. परंतु काही वर्षांनी ह्याची मला सवय झाली.

---

लेखन स्पर्धा २०२०-२१
लेख क्रमांक २

# शिक्षण घेतानाच्या आठवणी

श्री. सुरेश भिडे, बडोदा
मो. ६३५३२७१३०९

माझे उच्च शिक्षण बडोद्यातील 'एम.एस. युनिव्हर्सिटीत १९५१ ते १९५५ दरम्यान झाले. तेव्हाच्या न विसरण्यासारख्या काही आठवणी आहेत. पहा तुम्हाला आवडतात का. तुमच्याही काही आठवणींना उजाळा येईल. विद्यापीठाच्या वार्षिक महोत्सवाचे शेवटचे दिवशीचा करमणुकीचा कार्यक्रम 'सेंट्रल हालमध्ये चालू होता. नाच, गाणी, एकांकिका, नकला वगैरे. सर्व कार्यक्रमाची सूत्रे प्रा. ए. आर. चव्हाण यांच्याकडे होती. तीन-चार कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. त्यानंतर नाचाच्या कार्यक्रमासाठी कु. धारकर यांचे नाव जाहीर झाले. त्या स्टेजवर आल्या व नाच सुरू झाला. कथ्थक शैलीतील त्यांचे नृत्य खूपच अप्रतिम रीतीने सादर होत होते. कार्यक्रम खूपच रंगला होता. इतक्यात हॉलच्या गॅलरीत बसलेल्या काही मुलांनी स्टेजवर एक एक रुपयांची नाणी फेकली. त्या वेळी एक रुपयाच्या नाण्याचा खणखणीत आवाज येत असे. काही लक्षात यायच्या आतच चव्हाण साहेब स्टेजवर आले व जोराने मुलांवर ओरडले व कार्यक्रम संपल्याची घोषणा केली. काय वाटले तुम्हाला ? ती तुमची को-स्टुडंट आहे. अशी दाद द्यायची ? जरा शरम ठेवा. लाज नाही वाटत पैसे फेकायला ? चालते व्हा सर्व. सर्व प्रोग्राम रद्द आहे आता. विरस झाला आमचा. चांगल्या कार्यक्रमाला गालबोट लागले. जवळजवळ ६० वर्षे झाली ह्या गोष्टीला पण आठवण अजून कायम आहे.

केमिकल लॅब प्रॅक्टीकलचा तास होता. आम्ही प्रॅक्टीकल करत होतो. एवढ्यात माझ्या शेजारी काम करणारा विद्यार्थी 'ब्रह्मभट' अचानक माझ्याजवळ आला व म्हणाला, 'भिडे तुझी पिपेट दे ना जरा'. 'का रे ? तुझी तुटली काय ?' मी विचारले. 'नाही रे. पण सापडत नाहीये' तो उत्तराला. मी त्याला पिपेट दिली. जराशा वेळेत तो परत माझ्याजवळ येऊन म्हणाला, 'ही घे तुझी पिपेट.' मी बेसिनजवळ फ्लास्क वगैरे धूत होतो म्हणून त्याला सांगितले 'ठेव रे माझ्या ड्रॉवरमध्ये'. 'ठेवली' असे म्हणून तो त्याच्या कामाला लागला. थोड्याच वेळात आमचे दोघेही डेमॉन्स्ट्रेटर्स दरेक विद्यार्थ्यांची पिपेट तपासताना दिसले व माझ्या टेबलाजवळही आले. मी पिपेट काढून दिली. त्यांनी ती तपासली व मला म्हणाले, 'ही आमच्या टेबलवरची स्टॅण्डर्ड सोल्यूशनची आहे.' मी लगेचच ब्रह्मभटला म्हणालो, 'तू कुठली पिपेट ठेवलीस माझ्या कप्प्यात ? तू नेली होतीस ना ?' 'मला माहीत नाही. मी तुझी तुला परत दिली' तो म्हणाला. आमची बोलाचाली चालली होती पण श्री. माटे (डेमॉन्स्ट्रेटर) मधे पडले व म्हणाले, 'भिडे, तुम्ही स्टोअरमध्ये जा. तुम्हाला दुसरी पिपेट घ्यावी लागेल. मी चिठ्ठी देतोय.' मी दुसरी पिपेट स्टोअरमधून आणली. आता प्रश्न असा की डेमॉन्स्ट्रेटरना कसे कळले की त्यांची पिपेटच माझ्याजवळ आहे अथवा होती ? त्याचे उत्तर असे की विद्यार्थ्यांच्या पिपेटस् बोरोसिल मेकच्या होत्या आणि स्टाफच्या मेड इन इंग्लंड मेकच्या. पण हे सर्व का तर ब्रेकेज चार्ज मला भरावा लागला तोही क्षुल्लक म्हणजे दोन रुपये. पण त्या बरोबरच छोट्याशा चोरीचा डाग लागला मला कायमचा जी मी केलीच नव्हती. हा माझा झालेला अपमान मी कधीही विसरू शकत नाही. साल १९५५. सालाबाद प्रमाणे ह्या वर्षीही आमच्या फॅकल्टीच्या व महाविद्यालयाच्या सर्व खेळांच्या वेगवेगळ्या स्पर्धा होत्या. दोनही ठिकाणी माझी पण कॅरम मिक्स डबल्सची एन्ट्री मी दिलीच होती. फॅकल्टीत माझी पार्टनर एक पारशी मुलगी मिस पेरीन नावाची. युनिव्हर्सिटीत मात्र माझी मोठी बहीण माझी पार्टनर असे. ह्या वर्षी तिने कॉलेज सोडले कारण तिला ग्रॅज्युएट होऊन नोकरी पण लागली. पेरीनला मात्र मी चारही वर्षे फॅकल्टीच्या स्पर्धेत पार्टनर घेऊन स्पर्धा जिंकलो होतो. माझी मोठी बहीण कॉलेज सोडून गेल्यामुळे मी पेरीन बरोबरच स्पर्धा खेळणार होतो. कारण आमची विनिंग टीम होती व आमचे तसे ठरले होते. मी ती भेटण्याची वाट पाहात होतो पण पेरीन मला बरेच दिवस भेटलीच नाही. राऊंडची तारीख लागली. माझी व पेरीनची भेट होत नव्हती. शेवटी मी दुसऱ्याच मुलीला पार्टनर घेऊन राऊंड खेळलो. पेरीनला हे कळले. ती माझ्याशी बोलेनाशी झाली. मी युनिव्हर्सिटीतले मिक्स डबल्सच्या फायनलला पोचलो पण फायनल हरलो.

फायनल परीक्षा झाल्या. मी उत्तम रीतीने पास झालो व मला नोकरीही लागली. तीही १९९३ ला संपली आणि वर २७ वर्षे झाली. पेरीनची भेट अजून झालेली नाही पण आठवण कायम आहे. आता ती काय करते, कोठे आहे काही माहीत नाही. पण तिने बडोदा सोडल्याचे समजले. असो. आय ॲम सॉरी पेरीन, प्लीज.' मी एवढेच तिला सांगू शकतो. अजूनही मला ही आठवण आली की वाईट वाटते. कालाय तस्मै नमः !

लेखन स्पर्धा २०२०-२१
लेख क्रमांक ३

# एक अविस्मरणीय रात्र

प्रभाकर वा. भिडे, डोंबिवली.
मो. ९९६७१८४८१७

## एक ट्रिपची गोष्ट

ठरविल्याप्रमाणे आमचा १७ जणांचा ग्रुप १५ दिवसांच्या मोठ्या यात्रेसाठी एप्रिल २०१० ला निघाला. ओरिसा, गंगासागर, कलकत्ता, सिक्कीम, दार्जिलिंग, नेपाळ. सिक्कीमला जाण्यासाठी आम्ही गंगटोकला रात्री मुक्कामकरून सकाळी आठच्या सुमारास निघालो. आठ माणसांची व्यवस्था असलेल्या चार जीप गाड्या सिक्कीम बार्डरला नेणार होत्या. सिक्कीम हे हिमालयातल्या दुर्गम भागातले सर्वात उंच ठिकाण. इथे या भागात सर्वत्र मिलिटरीचीच सत्ता व त्यांनी तयार केलेले रस्त. भारत-चीन सीमेवरील बथुला खिंड स्टेशन (पोस्ट) याच भागात येते. खूप चढाव व वेडीवाकडी वळणे घेत आमची गाडी चालली होती. सर्वत्र दूरवर हिमशिखरे व उंच पहाड दिसत होते. ते सृष्टी सौंदर्य पाहात अडीच तासांनंतर चांगुलेक हे प्रसिद्ध सरोवर लागले. ते परत येताना आरामात पाहू असा विचार ठरवून आम्ही सीमेवर निघालो. परत खूप लांबचा प्रवास केल्यानंतर सीमाभाग लागला. सर्व कागदपत्रे व्यवस्थित असून देखील मिलिटरीच्या जवानांनी आम्हाला सीमेपर्यंत जाण्यास 'आज सीमा बंद आहे, जाता येणार नाही' असे सांगून रोखले. आम्ही फार नाराज झालो. ड्रायव्हर म्हणाला, या पोस्टपासून जरा दूर असलेल्या भागातील भारत-चीन सीमेवर मी तुम्हाला नेतो. पण त्यासाठी प्रत्येकी ८०० रुपये द्यावे लागतील. आमचा नाईलाज झाल्यामुळे आम्ही कबूल केले. सीमेजवळ जाणारा रस्ता अगदी हिमालयपर्वताला लागूनच जात होता. दिवस कडक उन्हाचे होते. त्यामुळे बर्फ कोठे दिसत नव्हता पण ग्लेशियर्स ठिकठिकाणी दिसत होते. ड्रायव्हरने लांबवर आम्हाला एक ठिकाण 'बॉर्डर' म्हणून दाखवले. तेथे काही राहुट्या व जवान दिसत होते.

आमच्या गाड्या परतीच्या मार्गाला लागल्या. १ वाजून गेला होता. सर्वांना खूप भूक लागली होती. भोजनासाठी आम्हाला मुक्कामाला जायचे होते. थेट सरहद्दीपर्यंत जाता न आल्याने सर्वजण मनात खट्टू होते. आमच्या गाड्या अडीच वाजण्याच्या सुमारास चांगुलेकजवळ आल्या तोच बर्फ पडायला सुरुवात झाली. सर्व गाड्या पुढे गेल्या. मला चांगुलेक पाहून त्याचे फोटो घ्यायचे होते म्हणून मी ड्रायव्हरला गाडी थांबवायला सांगून खाली उतरून भराभर फोटो घेतले. जोंधळ्या एवढा पडणारा बर्फ आता बोरा एवढा पडू लागला. मी धावत जाऊन गाडीत बसलो. आम्ही जेमतेम ७-८ किमी. आलो. पुढे सर्व गाड्यांची रांग लागली होती. काही तरी अडचण उद्भवल्यामुळे रहदारी ठप्प झाली होती. बराच वेळ वाट पाहून आम्ही खाली उतरून काय झाले याची चौकशी करू लागलो. ड्रायव्हरने सांगितले की पुढे खिंडीत कडा कोसळून रस्ता पूर्ण बंद झाला आहे. आमची गाडी त्याने रस्त्याच्या बाजूला लावली. एका बाजूला दरी अगदी खोल खोल आणि दुसऱ्या बाजूला पर्वत. आता बर्फ मोठ्या आकारात वर्षावू लागला. थंडी वाजू लागली. आम्ही कोणीच गरम कपडे घातले नव्हते. मी तर एका तलम शर्टवरच होतो. गाडीच्या काचा बंद करून आम्ही पडणाऱ्या बर्फाकडे पाहात स्वस्थ बसून होतो. माझ्या आयुष्यात मी प्रथमच बर्फाचा पाऊस पाहात होतो. सर्वत्र बर्फाचे पांढरे शुभ्र पुंजके साठायला लागले. पहायला खूप मज्जा वाटत होती. थोड्या वेळाने बर्फ वर्षाव थांबला. लष्कराच्या ताब्यात सर्व प्रदेश असल्याने लवकरच ते रस्ता खुला करतील असे वाटत होते. पण हिमवृष्टीमुळे काम करणे मुष्किल आहे असे ड्रायव्हरने सांगितले. आता सर्व ड्रायव्हर एकत्र जमून मजेत विड्या-सिगारेट पीत गप्पा मारत होते. त्यांना असे प्रसंग नेहमीचेच. त्यांना नवलाई नव्हती. एव्हाना अंधार दाटू लागला. या प्रदेशात सूर्योदय व अस्त ५ वाजायच्या आतच होतो. आम्ही ड्रायव्हरला काही खायला व चहा मिळतो का ते विचारले. तो बऱ्याच वेळाने थोडे पॉपकॉर्न व बिस्कीटांचे पुडे आणि घोटघोट चहा घेऊन आला. ड्रायव्हर म्हणाला, तुम्ही सर्वजण मिलिटरी कँपमध्ये जा. आम्ही त्याला सांगितले की तू जेवणाची व्यवस्था कर व ब्लँकेटस् मिळतात का बघ. आम्ही रात्र गाडीतच काढू. तो गप्प बसला.

थोड्या वेळाने मिलिटरीचे काही बंदूकधारी जवान आले व आमची चौकशी करू लागले. सर्व गाड्या मिळून कितीजण आहेत याची मोजदाद करून ते परत गेले. एक तासाने ते परत आले व सक्तीने त्यांनी आम्हाला खाली उतरवले. आता काळोख खूप झाला होता. दऱ्या व सपाट रस्ता यात फरकच दिसेना. ते म्हणाले, तुम्ही गाडीतच रात्र काढण्याचा विचार केलात तर सकाळी थंडीमुळे तुमची लाकडे झालेली असतील व शिवाय कडा गाडीवर कोसळण्याची भीती आहेच. प्रत्येकाला हाताने धरून त्यांनी कँपकडे न्यायला सुरुवात केली. सर्वजण चाचपडत भीतभीतच चालत होतो. दरीत पडतो की काय अशी भीती वाटत होती. रस्ता अनोळखी. सर्वत्र बर्फ व चिखल. जवानांनी आमचे हात घट्ट पकडले होते. आमच्यात दोन प्रौढ स्त्रिया पण होत्या. त्यांना जवानांनी उचलून खांद्यावर घेतले. मला व इतर दोघा-चौघांना पण घेतले. काही जण रडू लागले. कोण कोठे आहेत, माझ्या बरोबरीचे कोठे आहेत काहीच दिसेना. कोणी बोलतच नव्हते. सर्व अवाक. दोन-अडीच किमी. चालल्यावर एक मोठा हॉल लागला. जवानांनी सर्वांना हाताला धरून आत नेले. सर्वजण थंडीने कुडकुडत होते. हात थरथरत होते. चेहरे घाबरलेले. हॉल वर सर्वांची दाटी झाली. मला ओझा व प्रभुघाटे वगैरे दूरवर दिसले.

जवानांनी सर्वांना प्रथम गरम पाणी प्यायला दिले. अशा प्रसंगात देखील मी कॅमेरा काढून ४-५ फोटो घेतले. थोड्या वेळाने आम्ही सर्वजण एकत्र आलो. जवानांनी सर्वांना गरम चहा दिला. तो हॉल म्हणजे मिलिटरी हॉस्पिटलची मेस होती. हॉलमध्ये डिझेलवर चालणारे हिटर होते. आमच्याबरोबर आलेल्या कलकत्ता मारवाडी ग्रुपने आपल्या स्वभावधर्माप्रमाणे खुर्च्या बळकावण्यास सुरुवात केली. खुर्चीचे महत्त्व फार. मी

ओझाला पटकन एक खुर्ची माझ्यासाठी पकडायला सांगितले. मी पायातले ओले मोजे काढून पाय हिटरजवळ धरून शेकले. आता जरा सर्व स्थिरस्थावर झाले. सर्वजण खालच्या आवाजात गप्पा मारू लागले. थोड्या वेळाने खिचडी व रस्सा असे जेवण आले. मला जेवावेसे वाटत होते. मी सकाळी न्याहारी केली नव्हती. पण जेवण घेतले तर पाणी प्यावे लागेल आणि सर्वत्र अतिथंड वातावरण, रात्री जर लघवीला जायला लागले तर अंधारात बर्फावरून अशा अनोख्या जागी जावे लागेल या भीतीने जेवण व पाणी घेतले नाही. हॉलमध्ये टॉयलेटची सोय नव्हती. थोड्या वेळाने मिलिटरीचे काही लोक आले. त्यात बरेच महाराष्ट्रीयन होते. ते म्हणाले की सर्वांसाठी हॉलमध्ये अंथरुणाची व पांघरुणाची व्यवस्था केली आहे तेथे जा. पण फारच थोडे गेले. बाकी बसून राहिले. काही जमिनीवरच लवंडले. आता रात्रीचे १२ वाजले. डोळे चुरचुरत होते. पण झोप येत नव्हती. मी रात्र बसून काढली. केव्हा उजाडेल याची वाट पाहात. पाचच्या सुमारास चहा आला. पण ग्लासची टंचाई. कोणाचा तरी उष्टा ग्लास धुवून घेतला व गरमागरम चहा प्यालो. सकाळी साडेसातला न्याहारी आली. गरम पुरी भाजी, ब्रेड व जॅम. तोच आनंदाची बातमी आली की रस्ता खुला झाला आहे. ऑल क्लिअर. आम्ही जाण्यासाठी सज्ज झालो. काहींच्या चपला रात्री बर्फात रुतून गायब झाल्या होत्या त्यांना मिलिटरी डेपोतून त्यांच्या मापाच्या चपला दिल्या गेल्या भेट म्हणून. सर्वजण चालत गाड्या ठेवल्या होत्या तिथे आलो. सर्वत्र चिखल व पाणी होते. गाड्या योग्य जागी आडोशाला ठेवलेल्या होत्या. पण आता ड्रायव्हरचा पत्ता नव्हता. ते ठिकाण मोबाईल कक्षेत नव्हते. संपर्क होत नव्हता. वाट पाहण्याशिवाय इलाज नव्हता. मी एकूण ३० तास झोप न घेता बसून होतो. शेवटी एकदाचा ड्रायव्हर आला. आम्ही गंगटोककडे निघालो. आमच्या इतर तीन गाड्या सुदैवाने कशाबशा क्षणातच या आपत्तीतून सुटल्या होत्या व ते लोक दार्जिलिंगला रवाना पण झाले होते. आयुष्यातला हा अनोखा संकट प्रसंग आम्ही सर्वांनी खरोखरच फार धीमेपणाने उपभोगला. या सर्वांचे श्रेय ईश्वराला जो भारतीय जवानांच्या कृपेने आमच्या मदतीला धावला. जय जवान.

---

**लेखन स्पर्धा २०२०-२१**
**लेख क्रमांक ४**

# टोपणनावे

- सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे
फोन : ०२०-२५३९७०६१

टोपणनावांचा विचार करता, माझ्या मनामध्ये त्याचे अनेक प्रकारही आले. १) लाडाने ठेवलेले नाव, उदा. बंड्या, चिंगू इत्यादी. २) काही उपाधवर नावे, उदा. लोकमान्य, शाहीर, साहेब, बालकवी इत्यादी. ३) संक्षिप्तरूप (शॉर्टफॉर्म) चिंवि (जोशी), चिंत्रं, लोकनायक. मराठी संक्षिप्तांची इंग्रजी रूपे - सीडी (देशमुख), एसएम (जोशी) इत्यादी. ४) काही अपभ्रंशीय नावे - गजा, पक्या, शऱ्या, अरु, सरू.

ह्या अशांसारख्या टोपण नावांचा विचार करता मला पहिले नाव आठवते ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. लोकमान्यांचे पाळण्यातले नाव 'केशव' असे होते, पण बाळ व चिखलगाव यांचे चुकीचे संदर्भ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला सांगितले जातात. बाळ गंगाधर टिळक यांना जाऊनही शंभर वर्षे झाली. तरी बाळ हेच नाव सर्वतोमुखी आहे. लोकमान्यांच्या बाबतीत पालक, शिक्षक नेहमीच दोन चुकीच्या गोष्टी सांगतात. त्यांचे मूळ नाव बाळ आणि चिखलगावी त्यांचा जन्म झाला. पण मी कोकणातील दापोली तालुक्यातील रत्नागिरी जिल्ह्यातील असल्याने वर्गात मुलांना शिकवताना टिळकांचे मूळ नाव केशव होते आणि चिखलगाव हे त्यांचे पिढीजात गाव पण त्यांचा जन्म रत्नागिरी गावात झाला असे शिकवत असे. एकदा चिपळूणकर नावाचे एक पालक शाळेत तक्रार घेऊन आले. मी त्यांना संस्कृत व मराठीमधील मूळ टिळक चरित्रातील संदर्भ दाखवून दिले तेव्हा ते शांत झाले. मी सुमारे पस्तीस वर्षे एकाच शाळेत शिक्षिका होते. त्यामुळे वडील आणि मुलगा दोघेही माझे विद्यार्थी. एकदा दुसरीतील एक मुलगा माझ्याशी बोलत होता. मी त्याच्या अक्षरावर खूष होते. त्याचे नाव विचारले. त्याने चिन्मय प्रकाश जोशी असे नाव सांगितले. 'बाई मी पक्या जोशाचा मुलगा. बाबांनाही तुम्हीच शिकवलेत ना ?' इतर मुले म्हणाली, 'बाई, आम्ही त्याला चिन्या म्हणतो'. चिन्यावरून आठवले, माझ्या एका पुतणीचे नाव (टोपण) चिनू होते. पुढे तिचे खूप शिक्षण झाले, लग्न झाले. तिची सासू माझी विद्यार्थिनी निघाली. एकदा तिच्याशी बोलताना मला पुतणीचे मूळ नावच आठवेना. तेव्हा तिची सासू म्हणाली चिनू का ? ती पुढच्याच महिन्यात अमेरिकेतून येईल. (मला गंमत वाटली. चिनू हे नाव सासूच्या तोंडी बसलेले पाहून नवल वाटले) दुसरा अनुभव आला, एका सुनेचा ! तिच्या लग्नाला मी हजर नव्हते. ती प्रथम भेटली तेव्हा स्वतःच म्हणाली, मामी मी छोट्याची बायको. मी पटकन म्हटलं, 'तुला कसं हे माहीत ?' 'अहो काय करू ? तुमच्या पिढीला 'विनायक' म्हटले तर लक्षातच येत नाही.' असो आता छोटूचा गोटू लग्नाचा होईल. माझ्या एका मैत्रिणीच्या मुलीचे नाव राधिका पण कुटुंबीय तिला गुड्डी म्हणतात. लग्न ठरल्यावर सर्वांनीच तिला राधिका म्हणायला प्रारंभ केला. पण सर्वांनाच तारेवरची कसरत करावी लागते. संत महात्मेदेखील ह्या गोंधळातून सुटत नाहीत. ज्ञानेश्वर एक की दोन हा वाद काही काळ झाला होता. कारण ज्ञानेश्वरीत सर्वत्र ज्ञानेश्वर हा शब्दप्रयोग दिसतो तर अभंगात ज्ञाना, ज्ञानोबा, ज्ञानदेव इत्यादी शब्दप्रयोग आढळतात. माझी एक भिशीची मैत्रीण आहे. वय वर्षे ७८. तिला सर्व मैत्रिणी बेबीआजी म्हणतात. कारण बालपणापासून सर्व आप्त तिला बेबी म्हणतात. नुकती बोलू लागलेली मुलेही आपल्या आजीला टोपण नावे ठेवतात. माझी मुलगी तिच्या नातीला (ओवी) मिठ्ठू म्हणते, छोटी ओवी बोलू लागली तेव्हा ती तिच्या आजीलाच मिठ्ठू आजी म्हणू लागली. एकूण काय ! टोपण नावाने कधी इतिहास बदलतो, कधी वाद होतात, कधी गंमती घडतात, विनोद होतात. चालायचेच, टोपण नांवे जीवनात चटणी, लोणच्याचे काम करतात. मलाही विद्यार्थ्यांनी एक टोपण नाव दिले होते पण मी ते येथे सांगणार नाही. कारण आपण मला त्याच नावाने ओळखू लागाल !

लेखन स्पर्धा २०२०-२१

लेख क्रमांक ५

# शाळेतील आठवणी

- सौ. नीला नंदकुमार ताम्हणकर
मो. ९३२६६९१४२१



मज आवडते ही मनापासुनी शाळा, लाविते लळा ही जशी माउली बाळा
मग लोक बोलतील 'धन्य धन्य ती शाळा'

शाळा हा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. शाळेविषयी वाटणारी आत्मीयता प्रत्येकाच्याच आतमध्ये लपलेली असते. यात तिळमात्र शंका नाही. आज ती व्यक्त होतेय इतकंच. माझे बालपण सातारा गावात गेले. शहर तसं छोटंसं. या गावातील माझी पहिली शाळा नगरपालिका मराठी शाळा नं. ११. आम्हाला असतीकर नावाच्या बाई होत्या. त्यांच्याकडूनच श्रीगणेशा शिकले मी. त्यांचा तो आंबाडा, गोल चेहरा, मोठे कुंकू, नऊवारी साडी अजून डोळ्यांसमोरून जात नाही. माझ्या वर्गात विमल भोकरे नावाची माझी मैत्रीण मला शिवणकाम करून द्यायची. मग मी तिला गणितात मदत करत असे. माझे आडनाव 'भिडे' असल्याने मैत्रिणी मला प्रेमाने बिड्ड्या म्हणत. वर्गात शैलजा मांडवगणे व शैलजा दिवेकर होत्या. त्यांना आम्ही दिवटी व मांडी असे म्हणत होतो. वर्गात शामला साधले नावाची मुलगी होती. तिचे गाल टोमॅटोसारखे लाललाल असत. ती खूपच सुंदर होती. तिला कॉलेजमध्ये फिशपाँड पडला होता. तो असा - 'लपविलास तू हिरवा चाफा, सुगंध त्याचा लपेल काय ?' तिचे मागणी घालून लग्न झाले. दुसरी एक मजेदार आठवण म्हणजे सातवीला पी.एस.सी. परीक्षा होती. तर शाळेत मी पहिली आले होते. तर माझी आई म्हणाली, 'वासरात लंगडी गाय शहाणी'. गायन शिकवायला फुले बाई होत्या. त्यांना पेटीवर फक्त 'जन-गण-मन' वाजवता येत होते. त्या ठरावीक गाणीच पेटीवर वाजवायच्या. श्रीमती बिडवे बाई होत्या, आम्ही दंगा करू लागलो की त्या 'धेंड' म्हणायच्या व वोढव वळा असे म्हणायच्या. आमच्या सातवीचा निरोप समारंभ लक्षात राहण्यासारखाच होता. अक्षरशः आम्ही वाळिंबे बाईंच्या घराची लूट केली होती. बाईंच्या घरी बटाटाभाजी व पुरी असा बेत केला होता. बाईंच्या घरातील गोडेतेल संपविले होते. भाजी म्हणजे तेलात पोहत होती. बाई शेवटी वैतागल्या. आम्हाला रागावल्या पण प्रेमानेच. माझी दुसरी शाळा पॉप्युलर इंग्लिश स्कूल, सातारा. या शाळेत जोशी सर होते. त्यातल्या त्यात वर्गात माझे इंग्लिश चांगले होते. माझी तिसरी शाळा डेक्कन एज्युकेशन सोसायटीची न्यू इंग्लिश स्कूल. माझ्या मावशीच्या नवऱ्यामुळे मला शाळेत प्रवेश मिळाला होता. एकदम स्टँडर्ड शाळा होती. पहिल्यांदा घाबरल्यासारखे व्हायचे. कारण आतापर्यंत वर्गात मुले नव्हती. मुलीच्या होत्या. वर्गात सर फळ्यावर शिकवत होते. माझे लक्ष नव्हते. मी बाहेर काहीतरी पाहात होते. सरांनी विचारले, 'हे कोण आहेत ?' तर मी उत्तर दिले, 'यजमान' म्हणून. सर्व वर्ग खोखो हसू लागला. शाळेत कुलकर्णी सर होते. ते गाणे छान म्हणायचे. आम्ही त्यांना गाणे म्हणायला सांगितले तर ते आढेवेढे घ्यायला लागले. मी भूषणाला म्हणाले ते डोळे मिचकावत आहेत म्हणून. तर ती म्हणाली, ती त्यांची सवय आहे. त्यांनी म्हटलेले गाणे - 'घन घन माला नभी दाटल्या कोसळती धारा, केकारव करी मोर काननी उभवुनि उंच पिसारा'... सर्वात आठवण म्हणजे ११ वीचा सेंडऑफ. निरोप समारंभाला खूप मजा आली होती व दुःख पण तेवढेच होते. माझी वर्ग मैत्रीण उर्फ माझी आतेबहीण भूषणा अभ्यंकरने शेवटचे गायलेले गीत अजुनही डोळ्यांत पाणी आणते.

'अखेरचा हा तुला दंडवत, तुला दंडवत, सोडुनि जाते गाव, दरीदरीतुनि मावळ देवा देऊळ सोडुनि धाव'

सर्वजणी रडलो होतो. भावना दाटून आल्या होत्या. धन्य ती शाळा व धन्य त्या आठवणी.

## काजळमाया

कधी वाटते क्षणात व्हावे, आकाशीचा एकच पक्षी,
पंख पसरुनी भरारीत या, रेखाटावी मोहक नक्षी ...
कधी वाटते नकळत व्हावे, झुळुक पहाटवाऱ्याची,
रविकराने कवेत घेता, आरक्त लालिमा ती उषेची...
कधी वाटते क्षणात व्हावे, रिमझिम सर ती मुसमुसणारी,
विरहव्याकुळ प्रियेच्या गाली, जणु आर्जवे ओघळणारी...
कधी वाटते नकळत व्हावे, नदीकाठचा रम्य किनारा,
गावकुसाची लेकुरवाळी मायेने गं कुरवाळणारा...
कधी वाटते क्षणात व्हावे, अभिमानी तो डोंगरमाथा,
दरीतल्या वाऱ्यासह घुमवी एक अनाहत प्रेमाची गाथा...
कधी वाटते तटस्थ होऊनि, माळावरचे हिरवे झाड,
वाटेवरच्या पांथस्थाला, गर्द सावलीची लावुनि ओढ...
कधी वाटते वाहत राहावे, वेशीवरचा होऊनि रस्ता,
निःशब्द वळणावर झेलुनि वाटसरूंचा रोज राबता...
कधी वाटते खेड्यामधले, चिमुकले घरटे होऊन जावे,
चंद्रमौळी झोपडीत माझ्या, जग इवलेसे सामावून घ्यावे...
कधी वाटते अवचित यावे, फिरुनि एकवार त्या आजोळी,
मायेच्या पंखातच निजली, छोटी पाऊले कोवळी कोवळी...
कधी वाटते क्षणात व्हावे, आजीची ती मऊ गोधडी,
पांघरुनि तिच्या सुरकुतल्या हातांची ती मधाळ गोडी...
कधी वाटते स्पर्शून यावी, दवांत भिजली अनवट वाट,
हिरव्याकंच देवराईची, भूल पडलेली एक सुरावट...
कधी वाटते ऐकावा तो, मंदिरातला घंटानाद,
संडा शिंपुनी प्राजक्त घालतो, गंधाळलेली आर्त साद...
कधी वाटते क्षणात जावे, पल्याड तिकडे सागरतीरा,
भरून घ्यावा श्वासामध्ये, अलगद ओला कृष्ण किनारा...
कधी वाटते नकळत व्हावे, कृष्णसख्याची लाडकी मुरली,
कृष्णमयी ती काजळमाया, राधा म्हणुनि तिथेच रुजली...!

- सौ. अनघा भिडे (सातर्डेकर), पुणे मो. ९००४०७८४३३

# कुंडलीतील मंगळ : मंगल की अमंगल ?

अचानक एके दिवशी माझ्या मैत्रिणीच्या मुलीचा फोन आला. आवाज जरा गोंधळलेला, घाबरलेला होता. मावशी वेळ आहे का तुझ्याकडे थोडा ? आधी तिला शांत केलं आणि सावकाश एक एक गोष्ट विचारून घेतली. तिला आश्वस्त केलं. तिच्या समस्येचं उत्तरही दिलं आणि तिच्या आईशी म्हणजे माझ्या मैत्रिणीशीही बोलले. समजावून सांगितलं. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की एवढी काय मोठी समस्या होती ? खरं तर समस्येपेक्षा एक साधा गोंधळ होता विचारांचा ! विषय होता - 'पत्रिकेतील मंगळ' !

लग्नाला उभ्या असलेल्या मुलामुलींच्या पत्रिकेतील 'मंगळ' हा त्यांच्या पालकांच्या मनात आणि पोटात भीतीचा गोळा आणणारा ग्रह ! इतकं घाबरायची गरज आहे का ह्या 'मंगळा'ला ? आयुष्यात खरंच इतकी गुंतागुंत निर्माण करण्याची शक्ती असते का ह्या ग्रहात ? जर इतका त्रासदायक ग्रह आपल्या कुंडलीत असेल तर आपण आयुष्यात यशस्वी होतच नाही का ? आपला विवाह होईल की मोडेल, की आपण कायम अविवाहित राहू ? अपत्य होताना काही त्रास होईल का ? आयुष्याची दोरी तर बळकट असेल ना आपल्या ? असे असंख्य प्रश्न, अनेक समस्या निर्माण होतात ना मनात ? आणि म्हणूनच आपल्याला 'मंगळ' ग्रहाची माहिती समजून घेणे गरजेचे आहे. अजिबात न घाबरता समजून घ्या. आपल्या पत्रिकेतील ह्या लढवय्या शिलेदाराला समजून, जाणून घेऊ या मंगळाची भीती किती खरी किती खोटी !

प्रत्येक ग्रहाचे आपल्या कुंडलीत असलेले योगदान महत्त्वाचे आहे. रवी (सूर्य) ज्याला आपण राजाची उपमा देतो. चंद्र म्हणजे राणी आणि मंगळ आहे आपल्या पत्रिकेतील सेनापती ! बुध आहे अर्थमंत्री. गुरू हा आपल्याला मार्ग दाखवणारा महामंत्री. शुक्र आहे सर्व सुखसुविधा देणारा. शनी आहे न्यायव्यवस्था. राहू-केतूंना कुंडलीमध्ये ग्रहांचा दर्जा न देता 'छेदन बिंदू' संबोधले जाते. छेद म्हणजे भाग करणे. ज्यांच्यामुळे असं समजलं जातं की माणसाच्या (जातकाच्या) आयुष्यात अनेक चढ-उतार येत असतात पण केवळ राहू-केतूंमुळेच असे घडत असावे का ? कितीतरी गोष्टी माहिती अभावी किंवा अर्धवट ज्ञानातून गैरसमजाला कारण होतात.

आपण आता कुंडलीतील मंगळाबद्दल माहिती घेणार आहोत. ह्या मंगळाच्या बाबतीत पुरेशी माहिती नसल्यामुळे अनेकांच्या विवाहात मिठाचा खडा टाकला जातो. 'मंगळा'ला आपण आपल्या पत्रिकेतील (कुंडलीतील) सेनापती म्हणून संबोधले आहे. अर्थात सेनापती म्हटलं की आक्रमकता, शौर्य, लढवय्येगिरी ह्या साऱ्या गोष्टी आपोआप येतातच. तर असा हा सेनापती नक्की कसा आहे ते आधी पाहू.

कुंडलीतील प्रथमस्थानी असलेला मंगळ हा त्या व्यक्तीची कार्यक्षमता दर्शवतो. अशी व्यक्ती सतत कार्यरत किंवा धडपड्या स्वभावाची असते. त्यांना करियर करण्यात, त्यात उच्चस्थान मिळवण्यात रस असतो. वृत्ती हट्टी, वाद घालण्याची असते. द्वितीयस्थानी असता जोडीदाराला आपल्याभोवती फिरायला लावण्याची ताकद असते. अर्थातच त्यामुळे नातलगांशी संबंध फारसे चांगले नसतात. स्वभाव फटकळ, भांडखोर आणि उधळा असण्याचीही शक्यता असते. तृतीयस्थान मंगळाला पराक्रम दाखवता येणारे स्थान. कायम पुढाकार घेऊन कार्य करण्याची थोडक्यात लढण्याची तयारी असते. कधी कधी ह्यातून अतिरेक झाल्यास हव्यास, भांडखोरपणा अनुभवाला येतो. चतुर्थस्थानाचा विचार करता घरात मंगळ गृहसौख्यात अडथळे आणतो, कारण घरात अशी लढवय्यावृत्ती असेल तर सामंजस्याचा अभाव, घरातल्या लोकांचा मान कधी कधी राखला जात नाही. पंचमातील मंगळ स्त्रियांना त्यांच्या मासिक धर्मात अडथळे दर्शवतो. षष्ठस्थान हे आपल्या तब्येतीचे/आरोग्याचे दर्शक आहे. अती शौर्य, तामसीवृत्ती आरोग्याला घातक ठरते आणि मग त्याचा परिणाम शरीराबरोबर मानसिक आरोग्यावरही होतो. आता सप्तमस्थान हे विवाह जोडीदाराचे स्थान ! इथूनच जोडीदारासंदर्भात मानसिक शारीरिक संबंधांचा विचार करावा लागतो. 'माणूस' लग्न करतो तेही सुखे मिळवण्यासाठीच. त्यात विषयवासनाही आलीच. ती तीव्र असेल आणि ती पूर्ण होत नाही म्हटल्यावर जोडीदाराशी वाद, हट्टीपणा अशा स्वरूपाच्या गोष्टी घडायला सुरुवात होते. या मंगळाचा स्त्री जातकाला ओटीपोटात दुखणे इत्यादी प्रकारचे त्रास होऊ शकतात. अष्टमस्थानाचा मंगळ जोडीदाराला धोकादायक ठरतो. उष्ण प्रकृती, उधळ्या स्वभाव अशी फले मिळू शकतात. नवमस्थानी असलेला मंगळ हा शौर्य देतो. धडाडीने कार्यात यश दर्शवतो, पण अतिरेक झाल्यास मोठ्यांचा अवमान करणे, मन मानेल तसे वागणे, या गोष्टींचा कारक ठरतो. दशमस्थानी मंगळ असता, व्यक्ती स्वावलंबी व कर्तबगार असते, पण त्यातही हट्टीपणा असतोच ! करियरच्या मागे लागणेही दिसून येते.

एकादशस्थानात (लाभस्थानात) ह्याचा विचार करता कुसंगतीचा (वाईट संगत) धोका, चांगला मित्रपरिवार असत नाही. खर्चिक, भांडखोर इत्यादी गोष्टी येतात. बाराव्या स्थानी (व्ययस्थानी) मंगळ असेल तर उधळेपणा, फाजिलपणा, व्यसनांच्या आहारी जाण्याची वृत्ती, तीव्र विषयवासना, बाहेरख्यालीपणा असण्याची शक्यता असते. ही झाली मंगळाची स्थानाप्रमाणे फलिते. आता आपण बघूया मंगळाची पत्रिका (मंगळ असणे) म्हणजे नक्की काय ? आपण मंगळाला 'सेनापती' म्हटलं आहे. त्याची स्वभाव वैशिष्ट्ये आपण पाहिली आहेत. आता पत्रिकेतील 'त्या' स्थानाबद्दल माहिती घेऊ, ज्यामुळे आपण जातकाला 'मंगळ आहे' असे म्हणतो. प्रथमस्थान (लग्नस्थान), चतुर्थस्थान (मातृस्थान), सप्तमस्थान (जोडीदाराचे स्थान/भागीदाराचे स्थान), अष्टमस्थान (मृत्युस्थान) आणि बारावे स्थान (व्ययस्थान). ह्यापैकी कोणत्याही स्थानी जर पत्रिकेत मंगळ असेल तर ती पत्रिका मंगळाची पत्रिका आहे असे म्हटले जाते. ह्यातील व्ययस्थानात मंगळ, चतुर्थस्थान इथे मंगळ असता, ह्या जातकाच्या विवाहासंबंधी फलात कमतरता राहते. जोडीदाराशी मतभेद, टोकाचे वाद, एकाकी जीवन व्यतीत करावे लागणे

अशी वेळ येण्याची शक्यता असते. थोडक्यात विवाह त्रासदायक ठरण्याची शक्यता असते. आठवेस्थान हे नैसर्गिक मारक स्थान आहे. त्यामुळे ह्या स्थानातला मंगळही त्याच्या फलात वैचित्र्य आणतो. जोडीदाराच्या स्वभावामुळे घरात मतभेदाच्या भिंती उभ्या राहतात व कुटुंबापासून दूर राहण्याची वेळ येते. प्रथम स्थानातील मंगळामुळे जातकाच्या ठिकाणी असलेली तामसीवृत्ती भांडखोरपणा दिसून येतो. जातकाचा स्वभाव जर अगोदर असा असेल आणि त्याच्या जोडीदाराचा मंगळही प्रथमच स्थानी असेल तर काय होईल सांगा ! दोघांचेही इगो कॅश झाले की वैवाहिक जीवनाचे तीन तेरा वाजायला वेळ लागेल का ? ही झाली मुलामुलींच्या पत्रिकेतील मंगळ योगाची माहिती.

आपण आधी मंगळाची स्थानानुसार मिळणारी फले पाहिली आहेत. त्यावरून तुम्हाला अंदाज आला असेल की हे प्रकरण किती प्रभावी आहे. तुमच्या लक्षात आले असेल की कुठल्याही स्थानी असला तरी हा मंगळ आपला प्रभाव दाखवतोच. पण मग सगळे अशुभच घडवतो का मंगळ ? अजिबात नाही. तो चांगले फलही देत असतो. मंगळ हा भूमीकारक आहे. हा शुभ योगात असता जातकाला जमीनजुमला, घर ह्यांचा लाभ होताना दिसतो. त्याच्या लढवय्या वृत्तीमुळे समाजात मान-मरातब मिळतो. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. त्यामुळे मंगळाच्या फलात शुभ-अशुभ दोन्ही प्रकारची फले बघायला मिळतात.

आपल्या मराठीमध्ये एक म्हण प्रचलित आहे, 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस !' तसेच मंगळाची पत्रिका असलेल्या जातकाच्या बाबतीत असेच घडताना दिसते. गैरसमजातून, अपूर्ण माहितीतून जे समोर येते, त्यावर बिचारे जातक आणि त्यांचे पालक विश्वास ठेवतात आणि आयुष्यभर ह्या मंगळाच्या बागुलबुवाला घाबरत राहतात. खरंतर आत्मविश्वास, धडाडी, स्वाभिमान देणारा हा ग्रह उगाच बदनाम आहे. कोणतीही गोष्ट अति न करता प्रमाणात राहिली, मर्यादेत केली, तर त्याचा त्रास कधीच होत नाही, पण ह्या दोन्हींमध्ये एक पुसटशी रेघ आहे, तिला विसरायचं नाही. कोणताच ग्रह पूर्णपणे चांगला किंवा वाईट नसतो. तर तो त्याच्या स्थानानुसार आणि त्याच्याबरोबर असलेल्या ग्रहानुसार फलात अधिक उणेपणा आणतो. वाचल्यावर काहीतरी कुठेतरी साम्य आहे असं वाटतंय ना ! अगदी बरोबर ओळखलंत. माणसांचे स्वभाव आणि ग्रहांचे स्वभाव सारखेच आहेत असं वाटतं आहे ना ! जसा माणसांवर संगतीचा परिणाम होतो अगदी तसा ग्रहांवरही होत असतो. एकदा हे समजून घेतले की मंगळाची भीती आपोआप कमी होईल तुमची.

एखाद्या तज्ज्ञ ज्योतिष्याचा सल्ला घ्या. समजून घ्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गुणमेलनाबरोबर ग्रहमिलनावर भर द्या. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करणारा प्रत्येक जण माणसाने समस्यांना तोंड कसे द्यावे, हे सांगतो. त्यावर मार्ग सुचवतो, म्हणूनच यापुढे मंगळाला न घाबरता समजून घ्या. काळजी करून, घाबरून प्रश्न सुटत नाहीत. गरज असते माहितीची. हे जर छान पद्धतीने समजून घेतले, तर 'पावली मंगळाई झालं मंगळ मंगळ !' या 'संत तुकाराम' सिनेमातील तुकोबांच्या आवडीच्या मुखी असलेल्या गाण्यासारखं सगळं मंगल (शुभ) होईल !

**– सौ. स्नेहल वि. भिडे**, ठाणे ९८१९३९८०४३

# हिंग शेती

आत्मनिर्भर भारत अभियानाची सुरुवात २०१६ साली झाली व त्या अंतर्गत भारत सरकारने 'हिंग' शेतीच्या अभ्यासाचे काम तज्ज्ञ व्यक्तींना सोपवले. त्यांच्या सल्ल्यानुसार ही शेती फक्त हिमालयाच्या घाटावरच होऊ शकते असे ठरले व भारत सरकारने हे काम कौन्सिल फॉर सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रीयल रिसर्चला पूर्णपणे सुपुर्द केले. 'हिंग' रोपे -४° ते ३५° सें. उष्णतामानातच जगू शकतात व त्याबरोबरच इतर काही मापदंड पण लक्षात घ्यावे लागतात. म्हणजेच वातावरणातील आर्द्रता, जमिनीची जात, पाण्याचा निचरा वगैरे वरील सर्व परीबळे लक्षात घेऊन ह्यासाठी लाहोल व स्पीती घाटात हिंग लागवडीला प्रयोगात्मक सुरुवात करण्यात आली आहे. हे सर्व काम सी.एस.आय.आर. ची उपसंस्था इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन बायोरिसर्च टेक्नॉलॉजी सात शेतकऱ्यांकडून करवून घेत आहे. हा प्रयोग जर सफल झाला तर पुढे लडाख, उत्तराखंड व अरुणाचलमध्ये ५०० हेक्टर जमिनीवर हिंग उगवण्यात येईल. हिंग मुळा व गाजराप्रमाणे जमिनीत उगतो व ३ ते ५ वर्षांनंतरच उपयोगात येतो. एका मुळापासून ३५० ते ४०० मिली रस काढून प्रोसेस केला जातो म्हणूनच हिंगाचे भाव २,००० ते ४०,००० रुपये किलो पावेतो असतो. चरकसंहितेत हिंगाचे वर्णन व आयुर्वेदिक उपचार आहे म्हणजेच युगानुयुगे भारतात हिंगाचा उपयोग माहीत आहे.

भारतातील सर्वच घरात हिंगाचा मुख्य उपयोग फोडणी, पापड, लोणचे वगैरेत करण्यात येतो. हिंगाशिवाय फोडणी असा विचारच करू शकत नाही आपण. म्हणजे कोकणस्थ ब्राह्मण तर हिंग साध्या वरणात सुद्धा टाकतो. साधं वरण खाताना एक वेळ तूप नसले तरी चालते पण हिंग हवाच. म्हणूनच हिंगाला स्वैपाकघरातील राणी असे संबोधतात. पुरातन ग्रंथात एक श्लोक आहे -

हिंगु वात कफानाह शूलघ्न पित्त कोपनम
कटूपाकरसंरुचं दीपनं पाचनम लघु'

म्हणजेच हिंग कफ वात हारक पण पित्तकारक आहे. शरीराला गरम, रुची जाग्रत करतो व भूक वाढवतो. भारताला हिंगाचा सर्वच वापर अफगाणिस्तान, इराण व उझबेकीस्तानवर अवलंबून आहे. परंतु ह्या तीनही देशांत अशांतता असल्याने भारताने आता भारतातच त्याची लागवड करण्याचे ठरवले आहे. अफगाणिस्तानचा हिंग पिवळट पांढरा व दुसरा लालसर असतो. दोन्ही प्रकारात स्टार्च व गोंद/डिंक मिसळून तो पावडर अथवा खडे स्वरूपात विकला जातो. पांढरा हिंग पाण्यात विरघळतो तर लाल तेलात विरघळतो. हिंग थंड पाण्यातून प्यायल्यास पोटशूळ बरा होतो असे म्हणतात.

**– सुरेश भिडे**, बडोदा
मो. ९००४०७८४३३

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**

# लॉकडाऊन रोजनिशी : ४५ वा दिवस

आज लॉकडाऊनचा ४५ वा दिवस. नेहमीसारखाच आरामात उठलो. तोंड-बिंड धुवून पहिला चहा घेतला. (आज चहा करण्याचा माझा टर्न नव्हता.) मग तोंडाला रुमाल बांधून, सॅनिटायझर हातांना लावून मग ब्रेड, दूध वगैरे घेऊन आलो. चार्जिंगला लावलेला मोबाईल काढला. डेटा ऑन केला व व्हॉटस्ॲप पाहायला सुरुवात केली. किचनमधून भांड्यांचे आवाज येत होते. सध्या बदललेल्या बॉडी लँग्वेजमुळे काही आवाज मुद्दाम होत आहेत हे कळत होतं पण त्याकडे दुर्लक्ष करून मी मोबाईलकडे बघण चालू ठेवलं. आठ-साडेआठ झाले असतील. अचानक किचनमधून ऐकू आलं, ''अहो, जरा कीस करता का ?'' मी ताडकन उडालो. आश्चर्याची जागा आनंदाने घेतली व या इष्टापत्तीला 'तोंड' देण्यासाठी मी किचनच्या दिशेने चालू लागलो. पण एकीकडे मनात धाकधूक होती. (मध्यमवर्गीय संस्कार ! दुसरं काय ? मनात येईल ते बेधडकपणे करायला आम्ही सेलिब्रिटी थोडेच आहोत !) अगं पण... ते सोशल डिस्टंसिंग... असं पुटपुटत मी किचनकडे जाऊ लागलो. पण नवऱ्याच्या वात्रटपणाची पूर्ण ओळख असल्याने आपल्या वाक्याचा विपर्यास होईल ही तिला खात्री होतीच. किचनच्या दारात येऊन ती म्हणाली, ''जळलं मेलं लक्षण ते ! का कोबी किसून द्या, सकाळी नाश्त्याला कोबी पराठे कर म्हणालात नं काल ? लॉकडाऊनमुळे मी जरी कोबी सारखी झाली नसले तरी तुम्ही ह्या कोबीचा किस करायचाय'' हातातील कोबी, किसणी व ताट दाखवत, पण थोडं हसून ही म्हणाली. (कोण म्हणतं बायकांना विनोदबुद्धी नसते ? कोबी या शब्दावर श्लेष साधून मी कोबीसारखी नाही असं म्हणाली ती !) राग जरी लटका होता तरी सद्य परिस्थितीत माझ्या मनातली कृती पूर्ण होण्याची सुतराम शक्यता नव्हती. मुकाट्याने मी कोबी, किसणी व ताट घेऊन बाहेर आलो. मी कोबी किसायला व हिने कणिक भिजवायला सुरुवात केली. परिस्थिती थोडी निवळली असावी कारण ही 'जीवनातला हा गडी असाच राहू दे' हे गाणं गुणगुणत होती. थोड्या वेळाने गाणं थांबलं व कणकेच्या गोळ्यावर थापट्या मारल्यासारखा आवाज येऊ लागला. पाठोपाठ शब्द आले, ''अहो मी पण कविता केलीये''. मी म्हटलं, ''कविता ? हो का !'' ''हो का काय ? तुम्हाला काय वाटलं आम्हाला येत नाहीत कविता करायला ?'' (कणकेवर चापट मारल्याचा आवाज). ''अरे वा ! छान, कधी केलीस ? म्हणून दाखव बरं !'' मी. ''थांबा जरा, हात धुवून येते. आमचा किनई कॉलेजच्या मैत्रिणींचा 'लकवा' ग्रुप आहे'' - ही. ''लकवा कोणाला मारला ?'' मी म्हटलं. ''अहो लकवा हे ग्रुपचे नाव आहे. तुम्हाला ते 'अलक' माहिती आहे ना राजेंद्र वैशंपायन ह्यांचे ?'' - ही. ''अलक ? नाही बुवा, काय आहे ते ?'' - मी. ''अहो असं काय, ते नाही का 'अति लघु कथा' म्हणजेच अ ल क'' - ही. ''हं, हं, ऐकल्यासारखं वाटतंय ! त्याचं काय ?'' - मी. ''तसंच आमचं लकवा, लघु कथा वाचन'' - हीने सांगितले. (ऐकून माझ्या शरीराला एकदम लकवा आल्यासारखं झालं). आज मी कवितावाचन करून ऑडिओ क्लिप टाकणार आहे. थांबा आता म्हणून दाखवते'' - ही.

भुईला भार खायला काळ, बनलेत आमचे कर्दनकाळ
रोज यांना खायला नवं, तेच तेच नको, वेगळं हवं॥
करते बापडी जे जे हवं, स्टेटस अपडेट रोजचं नवं
इन्स्टाग्राम व फेसबुक वर माझंही नाव जायला हवं॥

''अशी ही लघुकविता आहे. कशी वाटली ?'' - ही. मी म्हटलं, ''वा छान, चांगली जमली आहे.'' दुपारचे जेवण एकदम आनंदात गेलं. यथावकाश ऑडिओ क्लिप झाली 'लकव्यावर' अपलोड झाली. झोपण्याआधी 'कोबी पराठ्याचे' फोटो स्टेटसवर अपलोड झाले. आज तिने झोप स्किप केली. मग लाईक्स किती, कॉमेंट काय सर्व पाहायचं होतं ना ! उरलेला दिवस त्यातच गेला. ४५ व्या दिवशी रोजनिशीचे एवढेच पान भरलं.

# ४६ वा दिवस

आज लॉकडाऊनचा ४६ वा दिवस. काल आमच्यापासून ५०० मीटर अंतरावर अजून दोन ते तीन कोरोनाचे रुग्ण सापडले असं कळलं आणि त्यामुळे आज एकच दिवस कदाचित सगळी दुकाने उघडी राहतील व उद्यापासून काही मिळणार नाही अशा बातम्या यायला सुरुवात झाली. हे कमी की काय म्हणून एपीएमसी मार्केट पण ४ दिवस बंद राहणार असं कळलं. त्यामुळे उठल्या उठल्या गृहखात्याची अधिसूचना व सामानाची यादी हातात पडली. यादी व पिशव्या घेऊन जो बाहेर पडलो तो साधारण तासाभराने विजयी मुद्रेने परत आलो. ९९% गोष्टी मिळाल्या होत्या. यथावकाश ब्रेडचा नाश्ता झाला. ब्रेड पोटात बसला होता. ब्रेडचं एक बरं असतं. तो कसाही खा, भाजून खा, जॅम-बटर लावून खा, सँडविच करून खा, किंवा चहात/दुधात बुडवून खा, तो पोटात बसतो आणि तो बजेटमधे पण बसतो. बऱ्याचशा गोष्टी मिळाल्याने हिचा जीव भांड्यात पडला होता, त्यामुळे भांड्यात दुसरे काही पडायला थोडा वेळ होता. अंघोळ, पूजा वगैरे आटोपून मी सगळेच जरा निवांत बसलो होतो. मीही 'हाऊ टू विन ॲन आरग्युमेंट विथ वाईफ' नावाचं पुस्तक वाचत होतो व ही कालच्या हिच्या लघु कवितेवरील उशिरा आलेल्या प्रतिक्रिया व लाईक्स बघण्यात गुंग होती. तेवढ्यात मुलीने एक प्रश्न केला, ''बाबा प्रज्ञा व प्रतिभा यात सरस कोण ?'' मी उडालो, तिकडे हिनेही कान टवकारलेत हे लक्षात आलं. पाच एक सेकंद मी जरा विचार करत होतो. आमच्या ओळखीत २ प्रज्ञा होत्या. एक लांबच्या नात्यात व दुसरीला मी ओळखतो आणि ही ओळखून आहे. पण प्रतिभा कोण ? २ क्लायंटच्या कंपन्यांची नावे प्रतिभाने सुरू होतात. पण मालक पुरुष आहेत. मेंदूचं एक सेक्शन हे सगळं चाळत होतं. मी पुस्तकातून डोकं न काढताच म्हटलं, ''मी नाही कोणा प्रज्ञा व प्रतिभाला ओळखत.'' 'अहो तसं नव्हे, म्हणजे आपण म्हणतो की प्रज्ञेचा आविष्कार, किंवा पु.लं, गदिमा ह्यांची प्रतिभा अफाट होती वगैरे ती प्रज्ञा आणि प्रतिभा. मुलगी तुमच्या साहित्यात (?) डोकावते असं तुम्हाला वाटतं ती प्रतिभा'' इति मुलगी. मुलीने बापाला एवढी मोठी कॉम्प्लीमेंट दिल्यावर हिच्या चेहऱ्यावर आनंदाने हसू फुटलं. त्या प्रज्ञा व प्रतिभा आपण समजत होतो त्या नाहीत हे कळल्यावर पुन्हा जीव भांड्यात पडला होता. एक वाजायला आलाच होता. मुलीने दिलेल्या समाधानाने ही उठली व किचनमध्ये गेली. भांड्यात पडलेले जीव बाहेर आले व त्यांची जागा डाळ-तांदूळ यांनी घेतली. इतरही तयारी सुरू झाली.

''अगं ही सगळी बुद्धीचीच रूपे किंवा पैलू आहेत'' मी सांगायला सुरुवात केली. ''आपण जे ज्ञान घेतो त्याचं आकलन करण्याची जी शक्ती त्याला प्रज्ञा म्हणतात. ते जेव्हा आपण स्मरणात ठेवतो त्या शक्तीला मेधा

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

म्हणतात आणि ह्या दोघींच्या एकत्रित शक्तीचा आविष्कार म्हणजे प्रतिभा म्हणजेच अभिव्यक्ती. त्यामुळे असं सांगता येणार नाही की त्यांच्यात सरस कोण ते'' - मी. (हे चालू असताना कुकरच्या २-३ शिट्या झाल्याचे आवाज आले) ''पण मला वाटतं की प्रतिभा थोडी उजवी म्हणता येईल. म्हणजे फारशी प्रज्ञा व मेधा नसलेली लोकं सुद्धा प्रतिभा दाखवतात तर काहींना असं वाटतं की आपल्याकडेही प्रतिभा आहे'' - मी. ''म्हणजे तुमच्यासारखे'' - मुलगी (पुन्हा 'कचरा', ही आतमध्ये खूष !) मी दुर्लक्ष करून माझ्या स्मरणशक्तीला ताण देऊन थोड्या अजून टेपा लावल्या तेवढ्यात जेवणाची वर्दी आली व मी सुटलो. मुलीचे कितपत समाधान झाले माहीत नाही पण जेवणानंतर तिने विषय पुन्हा काढला नाही. मी मात्र विचार करू लागलो की खरच प्रतिभा श्रेष्ठ का ? थोडीशी प्रज्ञा व मेधा असलेला माणूस प्रतिभावान असू शकतो का ? ह्याचा मापदंड काय ? शाळा-कॉलेजमध्ये फारशी हुशारी दाखवू न शकलेली लोकं पुढे प्रसिद्धीत आलेली का दिसतात ? ही प्रतिभा नव्हे का ? योग्य वेळी, योग्य ठिकाणी, योग्य लोकांसोबत असणं, तसं फोटोत येणं ह्याला प्रतिभा लागतेच की ! ज्याला इंग्रजीत hobnobbing with rich and influential किंवा rubbing shoulders with rich and influential people हे करायला जमायला प्रतिभा लागतेच ! भरल्या पोटी हे सगळे विचार डोक्यात गर्दी करू लागताच निद्रा खुणावू लागली आणि प्रज्ञा, प्रतिभा मागे पडल्या. दुपारी तीन ते पाच जरा पुणेकर झालो. उठल्यावर चहापाणी, खाणं झालं. मग थोडा मोबाईलवर टाइमपास झाला, काही ऑनलाईन पेमेंट केली. मग ७ वाजता महाभारत वगैरे झालं. तासभर थोडं कॉम्प्युटरवर काम झालं. जेवण झालं. ४६ वा दिवस असाच संपला.

– **चिंतामणी भिडे**, ठाणे
मो. ८२९१३४१७७२

**पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे, १४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**

**सायंदैनिक प्राजक्त**

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथे छापून प्राजक्त कार्यालय, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६००२ येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 0231-2540427**
**email -** prajaktaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS**